जा-फे-मा २०१४ | मूल्य ३० रुपये

# सगुणा





गणेश
रामचंद्र
आपटे
अथांग क्षितिजाची ... उत्तुंग झेप !
एक नातं शतकाचं... 'मे. गणेश रामचंद्र आपटे' आणि सोलापूरकरांचं...
सोनेरी धाग्यात गुंफलेलं... रूपेरी किनार आणि हिऱ्यामाणकांची कोंदण असलेलं...
आपणां सर्वांची सोनं, चांदी दागदागिने आणि जडजवाहीरांची हौस पुरविताना
आमच्या पाच पिढ्या सोलापूरकरांच्या सोनेरी विश्वासानं उजळल्या...
आता 'गणेश रामचंद्र आपटे' नव्या क्षेत्रात पदार्पण आहेत...
आजवर बावनकशी सोनं दिलं, आता अद्ययावत
घर देणार आहोत...'इंद्रधनु'च्या रूपानं...
सोलापूर शहराच्या मध्यवर्ती भागात साकारणारा
'इंद्रधनु' हा महागृहप्रकल्प सर्व सुखसोयींनी सुसज्ज असेल.
जिथं आपलं समृद्ध जीवनशैलीचं स्वप्न साकार होईल...
॥ गणेश रामचंद्र आपटे ॥
सोलापूर: फोन: २३२४१३९
ट्रेडर्स
फोन: २३२६१२१
॥आपटे कानडे॥
ज्वेलर्स
पुणे : २४४५७०९०
इँद्रधनु
Indradhanu
सोलापूर: फोन: २३८०३९०

# सगुणा

जा-फे-मा २०१४ । वर्ष-२ । अंक-१

**संपादकीय**
वैचारिक संघर्षाला सिद्ध व्हावं लागेल । २

**मानाचे पान**
...स्त्रिया कुठे असतील? । *कॉम्रेड विलास सोनवणे* । ५

**लेख**
तिला निर्णय घेऊ द्या । *सौ० श्रीलेखा पाटील* । १३
नातं । *पूजा शिरुरकर* । १९
दारुबंदी : स्त्री सामर्थ्याचे अनोखे दर्शन । *डॉ० भारती पाटील* । २३
तिची अस्मिता खुडू नका । *शैला बोराडे* । २९
आता लढायचं कुणाशी? । *शरिफा बाले* । ३२

**इचारात सगुणा**
सामूहिकतेचा बळी गेला आहे । १५

**पानपूरके** । ताराबाई शिंदे - १२/१८ । मुक्ता साळवे - २०

**अभिप्राय**
अशोक पाटील । डॉ० न० म० जोशी । पांडुरंग कोळपे । २१-२२

**सगुणा विशेष**
मन हेलावून टाकणारे फुकुशिमाचे दुःख । *सत्यजित चव्हाण* । ३५

**कविता** । *शोभा करांडे* । ४०

**संपादक** । शोभा करांडे (९४२२०१३५८८) । अक्षरजुळणी व मुखपृष्ठ । पौर्णिमा गोडबोले
**मूल्य** : ३० रुपये । **वार्षिक वर्गणी** : १०० रुपये

MAHMAR/2013/52241
website:www.sagunatrust.org / Email:shobhakarande62@gmail.com
संपादकीय पत्रव्यवहार : सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस० पी० कॉलेजमागे, पुणे ४११ ०३० । दूरध्वनी : (०२०) २४३३७१२५ । ०९८२०२३५०३०

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक शोभा करांडे यांनी श्रीबालाजी एंटरप्रायझेस, धायरीफाटा, सिंहगड रोड, पुणे येथे छापून सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७, माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, पुणे. ४११०३० येथे प्रसिद्ध केला.

(या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.)

सगुणा

संपादकीय

# ...वैचारिक संघर्षाला सिद्ध व्हावं लागेल

मार्च महिना खूपच घडामोडींचा ठरला. निवडणुका जाहीर झाल्या आहेत. आठ मार्च गाजतोय. प्रचंड गारपिटीने व अवकाळी पावसाने महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालेलं आहे.

बदलणारं पर्यावरण, निसर्गाशी माणसानं केलेला खिलवाड आदींचा आता प्रत्यक्ष परिणाम दिसू लागला आहे. या परिस्थितीचा फायदा उठवत सर्व राजकीय पक्षांचं राजकारण रंगायला लागलं आहे. अशाप्रकारची नैसर्गिक आपत्ती म्हणजे राजकारण्यांसाठी इष्टापत्तीच ठरते. कारण या आधारे सरकारकडून कुठल्याना कुठल्या मार्गे निधी मिळवता येतो. आता त्याची गणितं जोरात सुरू झाली आहेत. शेतकऱ्यांचा कळवळा दाखवणारे सरकार, विरोधी पक्ष शेतकऱ्याला कसे लुबाडता येईल किंवा शेतकऱ्याच्या हतबलतेचा राजकारणासाठी फायदा कसा उठवता येईल याच विचारात आहेत. स्त्रियांच्या राजकारणाचा विचार या सगळ्या सध्याच्या परिस्थितीचा धांडोळा घेऊनच करावा लागेल.

स्त्री-पुरुष समतेची संकल्पना अकराव्या शतकात महानुभाव पंथाचे अध्वर्यू श्रीचक्रधरांनी 'लीळाचरित्रा'तून मांडलेली आहे. बसवेश्वरांनी बाराव्या शतकात स्त्रियांना समानतेचा दर्जा दिलेला आहे. रानावनांत, घरात बहुजन स्त्रिया निर्णायक व जबाबदारीच्या भूमिकेत आहेत. याच प्रमाणे बारकाईने शोधू गेल्यास प्रत्येक धर्माची उद्‌गाती स्त्रीच आहे, हे ध्यानात येईल. धर्म आणि राजकारण यांचा एकत्रित विचार होतो, तेव्हा या दोन्ही ठिकाणी स्त्रिया समतोल भूमिकेत असतात. जेव्हा जेव्हा पंथ, संप्रदाय निर्माण झाले तेव्हा तेव्हा ते त्या त्या तत्कालिन व्यवस्थेच्या विरोधातले एक विधानच होते, विचार होता, स्त्री-पुरुष समानतेचा गाभा होता.

समतेचा विचार घेऊन चालणाऱ्या विचारपरंपरा स्त्रियांकडे 'माणूस' म्हणूनच पाहतात. वास्तविक भारताला समृद्ध अशा मातृसत्तेचा वारसा लाभलेला आहे. निऋति-महदंबा-राजमाता जिजाऊ-बहिणाबाई सेऊरकर-ताराराणी-अहिल्याबाई-सावित्रीबाई-चांदबीबी-फातिमाबी इत्यादी अशी ही अतिशय समृद्ध परंपरा आहे. या समृद्ध

स्त्री परंपरेन आपापल्या अधिकाराचा, शिक्षणाचा, अनुभवाचा उपयोग अंतिमत: समाजासाठी, दिन-दुबळ्यांच्या उद्धारासाठीच केलेला दिसतो. यासाठीच स्त्री सत्ता असणं गरजेचं आहे.

मात्र आजची स्थितीगती पाहता स्त्रियांना खरं स्वातंत्र्य मिळालं आहे, असं ठामपणे म्हणता येत नाही. कारण ते वरवर दिलं असं वाटतं खरं, परंतु सूक्ष्मदृष्टीने पाहिल्यास भ्रमनिरास होतो. कारण आज सत्तेचा सोपान चढण्यासाठी कराव्या लागणाऱ्या मूल्यहीन व तत्त्वहीन तडजोडी प्रामाणिकपणाच्या कक्षेत मुळीच येत नाहीत. कारण त्यात स्त्री-पुरुष समतेचा बळी ठायीठायी दिला जातो. म्हणजे स्त्री-पुरुष समतेला वळसा घालून जेवढं करता येईल तेवढं करणं, याकडे आज सर्वांचा ओढा आहे. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे या सबंध प्रक्रियेत पुरुषकेंद्रीत व्यवस्थेला अजिबात धक्का लागत नाही. यातून स्त्रिया फार पुढे गेल्या, त्या खूप शिकल्या, त्या मॉडर्न झाल्या, त्या पुरुषांच्या बरोबरीनं वावरतायत असा वरवर भास निर्माण होतो खरा. परंतु जो खरा मूळ समतेचा विचार आहे, तो बायपासच होतो. त्यामुळे आजचं एकंदर सगळं चालचलन हेच मुळी बाजारवादाच्या दिशेनं जाणारं आहे. ते निसर्ग-माणूस केंद्रीत नाही. अशा एकूणच सद्य:स्थितीत व्यवस्था बदलाच्या कार्यात आता स्त्रियांना उतरावंच लागणार आहे.

राजसत्तेवर अंकुश ठेवू शकेल अशी धर्मसत्ता आज तरी आपल्याला दिसत नाही. या कठीण परिस्थितीमध्ये स्त्रियांनी मोठ्या संख्येनं सहभागी होऊन खऱ्या अर्थाने विषमतेची मुळे उपटून समतेचे राज्य प्रस्थापित करण्याचा निर्धार करणं आवश्यक होऊन बसलं आहे. स्त्रियांच्या राजकारणातील सहभागाने समाजाचं हित साध्य व्हायला मदत होऊ शकते.

हा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्व स्त्रियांनी एकत्र येण्याची गरज आहे. भगिणीभावाने एकमेकींच्या बरोबर राहून समतेची मूल्ये समाजमनावर रुजवावी लागतील. एकोप्याने आपल्या प्रश्नांचा विचार करून चुकीच्या गोष्टी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा या सर्वांचा निरास करावा लागेल. आजचे राजकारण, धर्मकारण, धर्मांधता आदींचा आपल्याला नीट खोलात जाऊन विचार करावा लागेल. प्रत्येक राजकीय पक्षाचा, तसेच विविध समस्या वा प्रश्नांचा अंतहेतू समजून घ्यावा लागेल. समोर जे दिसले ते खरे न मानता त्याच्या मुळाशी जावे लागेल. यासाठी चिकाटीने अभ्यास करण्याची गरज आहे. हा अभ्यास करताना आपले समृद्ध ऐतिहासिक वारसे जबाबदारीने तपासायला लागतील. आजच्या घडीला त्यांचा आधार घेताना आपल्याला त्याचे नीट आकलन होणे गरजेचे आहे. जोश आणि भावनिकता यावर नियंत्रण ठेवून समताधिष्ठ दृष्टीने समाजाची नवरचना करणे गरजेचे आहे.

जिजाऊ, ताराराणी आदीं राज्यकर्त्या स्त्रियांनी स्वतंत्रपणे आपापल्या क्षमतांनी यशस्वीपणे राज्यकारभार सांभाळला. हा इतिहास आपणाला आजच्या काळातही उभारी देणारा आहे. हा गतेइतिहास समोर ठेवून त्यातील स्त्रियांच्या राजकारभाराचे दाखले शोधून त्यांचा आजच्या स्थितिगतीच्या संदर्भात नव्याने अभ्यास करावा लागेल. या अभ्यासातून अनेक चांगले संदर्भ कळतील. किंबहुना त्यातच नवराज्यनिर्मितीचं बीजं आपल्याला सापडतील.

आज राजकारणामध्ये स्त्रिया नेमकी कोणती भूमिका निभावताना दिसतात? आजची पुरुषसत्ता आणि त्यावर उभा असणारा भांडवलशाहीचा डोलारा यामुळे मानवसमाज हा केवळ वस्तुरूपाने उरला आहे. त्याकडे बघण्याची आपल्या सर्वांची दृष्टी केवळ यांत्रिक झाली आहे. नफा व नुकसान वगळता किंवा यापलीकडे जाऊन प्रेम-माणुसकी-समाजहीत या गोष्टी प्रचलित राजकारणातून आज हद्दपार झालेल्या आहेत. या अवकाशात राखीव जागेच्या माध्यमातून स्वत:चं स्थान शोधणारी स्त्री कशाप्रकारचे राजकारण करील, हेही शोधणं महत्त्वाचं आहे. प्रचलीत सत्ता व ती सत्ता मिळवण्याची व्यवस्था हे दोन्ही मार्ग भ्रष्टाचाराने प्रचंड पोखरलेले आहेत. माणसाचे मूल्यभान, नैतिकता पैशापोटी गहाण पडलेली आहे. पैशाचा हव्यास माणसाला एकीकडे बेदरकार करतो आहे तर दुसरीकडे कसल्याच मर्यादा शिल्लक ठेवू शकत

नाही. कारण राजकारण सत्ता केंद्रीत झाले आहे, सत्ता बाजारकेंद्रीत आणि बाजार पैसा केंद्रीत झाला आहे. पैसा असेल तरच तुम्ही सत्ता मिळवू शकता, असं सरळ गणित आहे. या सत्तासंपादनाच्या खेळामध्ये विचारांची बांधीलकी, मूल्य, धारणा, आयडियालॉजी या गोष्टींना कवडीची किंमत राहिली नाही. पैसा मिळवण्यासाठी पत्करलेले मार्ग समाज व मानव हिताच्या पूर्ण विरोधातलेच आहेत. हाच आजच्या सत्तेचा राजमार्ग आहे.

आपलं अज्ञान, आपला वैचारिक गोंधळ हा या बाजारू व्यवस्थेसाठी पूरकच ठरत आहे, हे आपण जाणलं पाहिजे. बहुजन स्त्रियांमध्ये असणारी उपजत व्यवहारदृष्टी-उत्पादकदृष्टी केवळ बचतगटांमध्ये जिरवून टाकणं, हेही येणारा काळ पाहता धोक्याचं आहे. हा धोका आपण वेळीच ओळखून सत्तेचं राजकारण व राजकारणाचं व्यवहारशास्त्र नीटपणे जाणून घेतलं पाहिजे. त्याबद्दलचं आपलं म्हणूनचं एक आकलन तयार केलं पाहिजे.

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन व आपापले पूर्वग्रह वा न्यूनगंड दूर करत करत स्वत:ला विकसित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परंतु न्यूनगंड, फस्ट्रेशन, हतबलता घालवायची म्हणून कुठल्या तरी छाटछूट भंपक माता-बाबाबुवाच्या किंवा बैठका आदींच्या नादाला लागणं म्हणजे आपणच आपल्याला कालकोठरीतील अंध:काराला कवटाळणे होय. अशा भंपक बाबा-मातांच्या नादी लागून आपले प्रश्न तर सुटणारच नाहीत, परंतु त्यांच्या अस्तित्वासाठी-त्यांच्या मार्केटसाठी आपला सर्वतोपरी वापर आणि शोषण होण्याची शक्यताच अधिक आहे, हे आजवरच्या अशा अनेक प्रकरणांवरून सांगता येते.

आपली स्वतंत्र ओळख करण्यासाठी आपलं जग आपण आपल्या ताब्यात घ्यायला पाहिजे. ते समतावादी पद्धतीनं घडवायला पाहिजे. कोंडलेला अवकाश मोकळा करून समाजविकासाच्या सर्व वाटा समतेच्या मार्गाने न्यायला हव्यात. यासाठी बहुजन समाजातील स्त्रियांनी कंबर कसली पाहिजे, मनोनिग्रह केला पाहिजे. परंतु हे करताना एक बाब लक्षात ठेवायला हवी की आपल्या या उपक्रमामुळे समाजातील इतरांच्या जगण्यावर व त्यांच्या हक्कांवर कुठल्याही प्रकारचं अतिक्रमण होता कामा नये. खरं म्हणजे सर्वांना सोबत घेऊन व्यापक करत करत आपणाला हा उपक्रम पुढं रेटता आला पाहिजे. त्यातच एकंदर समाजाचं भलं आहे. अशाप्रकारच्या व्यापकतेची आपली परंपरा आपण कायम ठेवली पाहिजे. व्यापकतेची ही बिजं आपल्या समृद्ध श्रमसंस्कृतीत रुजवलेली आहेतच. फक्त त्या बिजाशी असलेली घट्ट पण आज तुटू पाहणारी नाळ आपल्याला पुन्हा घट्ट जोडावी लागेल. ती तुटता उपेगी नाही. त्यातून आपलाच नाश आहे.

टीव्ही, मालिका, चित्रपट, प्रत्येक बातमी, रियालिटी शो, जाहिराती या सगळ्यांमागचा सुप्त हेतू, कार्यकारणभाव नीटपणे समजून घेतला पाहिजे. मूळ मुद्द्यांवरील आणि मूळ प्रश्नांवरील आपलं लक्ष विचलित करण्यासाठी अशाप्रकारची माध्यमं आज प्रभावीपद्धतीनं वापरली जातायत. त्यात ही माध्यमं बाजारपूरक व बाजारकेंद्रीत आहेत, हे विसरता कामा नये. म्हणूनच मेंढरासारखं कोणाही आवाजाच्या पाठीमागे जाण्याआधी आपली स्वत:ची वैचारिक बैठक भक्कम केली पाहिजे. ही बैठक भक्कम असेल तरच त्या आवाजातील चढ-उतार, च्छटा आपल्या लक्षात येतील. या वैचारिक बैठकीला कष्ट व अभ्यासाची जोड देऊन धिराने व चिकाटीने पुढे गेलं पाहिजे.

नवसमाजरचनानिर्मिती करण्याची क्षमता स्त्रियांच्या राजकारणात असू शकते, आहे हे ध्यानात घेऊन स्त्रियांनी त्या दृष्टीनेच समाजकारण-राजकारणाची व्यूहरचना आखावी. पैसा, प्रसिद्धी अशा उथळ गोष्टींच्या मागे न लागता दूरदृष्टीने वैचारिक-सामाजिक-राजकीय हस्तक्षेप करणं गरजेचं आहे. नव्हे ती आजची मोठी निकड होऊन बसली आहे.

देश-समाजाला योग्य दिशा देण्याचं काम बहुजन स्त्रिया अतिशय उत्तम करू शकतात. यासाठी त्यांना आता वैचारिक संघर्षाला सिद्ध व्हावं लागेल.

■

सगुणा

**मानाचे पान**

# ...स्त्रिया कुठे असतील ?

कॉम्रेड विलास सोनवणे

राजकारणातील स्त्रियांबद्दल भारतातील लोकांचा तथाकथित आधुनिक दृष्टिकोन मुळातच तपासून घ्यायला हवा. आपल्याकडची आधुनिकता ही मेकॉलेच्या इंग्रजी शिक्षणासोबत सुरू होते. आणि इंग्रजी साक्षर वर्ग स्वत:च्या मुळाबद्दल अजिबात विचार न करता किंवा त्यांचा शोध न घेता प्रत्येक गोष्ट इंग्रजी वेष्टित करत जातो. मुळातच इंग्रजी शिक्षणासोबत आलेले - खरे म्हणजे इंग्रजी साक्षरते सोबत आलेले - मूल्य-परंपरा-विचार इत्यादींना इंग्लंडचे आणि अधिक व्यापक करून बोलायचे असेल तर युरोपचे संदर्भ आहेत. म्हणजे युरोपिय समाजरचना त्यातही युरोपच्या मध्ययुगीन समाजरचनेमध्ये पुरोहित व सरंजामदार यांच्याशिवाय कुणालाही व्यक्ती म्हणून 'अस्तित्व' नव्हते. स्त्रियांना तर अस्तित्वच नव्हते.

तुर्कांमुळे आशिया खंडाशी विशेषत: भारताशी असलेला व्यापार बंद पडल्यामुळे युरोप खंडात निर्माण झालेली व्यापाराची कोंडी फोडण्यासाठी युरोपीयन व्यापारीवर्गाने जगाचा शोध घ्यायला सुरुवात केली. युरोपातील व्यापाऱ्यांनी शोधलेल्या जगामुळे व या जगाच्या लुटीमुळे युरोपात भांडवल संचय होऊ लागला. या भांडवलावर आधारित उद्योगांना मोठ्या संख्येने श्रमिकांची गरज होती. ही श्रमिकांची गरज पूर्ण करण्यामध्ये

युरोपातील संरजामशाही व पुरोहितशाही अडथळा म्हणून उभी होती. या अडथळ्याच्या विरोधात किंवा हा अडथळा दूर करण्यासाठी व्यापारीवर्गातील बुद्धिजिवी मंडळींकडून व्यक्ती व सामाजिक गरजा यांच्या आंतरसंबंधाबद्दल चर्चा सुरू झाल्या. या चर्चेतून पोप नावाच्या संस्थेने उभ्या केलेल्या धर्मरचनेला, धर्म संकल्पनेला व तिच्या आधाराने प्रस्थापित झालेल्या पुरोहितशाहीला आणि त्या पुरोहितशाहीने प्रस्थापित केलेल्या ज्ञानाच्या संकल्पनांना प्रश्न विचारण्यास सुरुवात झाली. प्रश्न विचारण्याची ही सुरुवातच युरोपमध्ये नवे युग घेऊन आली. पंधराव्या शतकात सुरू झालेल्या या नव्या युगाने संरजामाहीला पूर्णपणे नेस्तनाबूत केले. धर्म व राजकारण यांची फारकत करत व्यक्तीच्या अस्तित्वाचा व प्रतिष्ठेचा मुद्दा अधोरेखित केला. याचा फायदा घेत युरोपातील स्त्रियांनी धर्मसत्तेपासून राजसत्ता, अर्थसत्ता, सांस्कृतिकसत्ता इत्यादी जीवनाच्या विविध अंगांना विविध रूपाने व्यापणाऱ्या पुरुषसत्तेला आव्हान दिले.

भांडवलशाहीला श्रमाच्या बाजारपेठेमध्ये स्त्रियांचा श्रमशक्तीची क्रयवस्तू म्हणून का होईना, पण आवश्यकता होती. त्यासाठी औपचारिकता का होईना स्त्रियांना व्यक्ती म्हणून मान्यता देण्याची गरज होती. भांडवलशाहीला अभिप्रेत असलेले औपचारिक व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तींना अभिप्रेत असलेलं खरंखुरं स्वातंत्र्य हा आंतरविरोध युरोपकेंद्री भांडवली व्यवस्थेचा स्थायिभाव राहीला आहे.

युरोपियन लोकांनी म्हणजे त्यातील इंग्रज, फ्रेंच व पोर्तुगिजांनी भारतीय उपखंडावर कब्जा केल्यानंतर भारतातील परिस्थितीचा कणभरदेखील विचार न करता युरोपिय भांडवलशाहीच्या विकासाला पुरक ठरतील अशी धोरणे (महसूल-प्रशासन-सैन्य-शिक्षण-न्यायव्यवस्था-पोलिस व्यवस्था-जमीन-पीकपद्धती इत्यादी) व्यवस्थात्मक संरचना राबवताना स्वीकारले. त्यामुळे इंग्रजी रचनेचा भाग बनलेल्या एका इंग्रजी साक्षरवर्गाची निर्मिती करण्यात ते यशस्वी झाले. या इंग्रजी साक्षर वर्गाने आपले ते-ते वाईट त्यांचे ते-ते चांगले असा आंधळा इंग्रजीसाक्षर दृष्टिकोन स्वीकारून भारतामध्ये धर्मसुधारणांपासून स्त्रीपुरुष नात्यातील सुधारणेपर्यंत युरोपकेंद्रीत धोरणे अंमलात आणायला सुरुवात केली. भारतातील सामाजिक रचना ही वर्णजात रचना होती. तिच्या बदलांची म्हणून तिची एक गती होती. या गतीमुळे वर्णव्यवस्था प्रस्थापित होऊन त्यामध्ये ज्ञानसत्ता, राजसत्ता, अर्थसत्ता त्रिवर्णांच्या हातात केंद्रीत व्हायला लागल्यानंतर इथल्या स्त्री शूद्रातिशूद्रांनी प्रथम जैन, चार्वक, बौद्ध आदींच्या नेतृत्वात त्याला आव्हान उभे केले. इथल्या वर्णजातव्यवस्थेचे काही ठळक वैशिष्ट्ये होती. त्यामध्ये युरोपमधील स्त्रियांचे व्यक्ती म्हणून, किंबहुना माणूस म्हणूनचे अस्तित्व पूर्णपणे नाकारले गेले नव्हते. इथल्या शिवलिंगात लिंगासोबत योनीला बरोबरीचे स्थान होते. इथे शिवाचे एक रूप अर्धनारी-नटेश्वराचे आहे. इथे देवीचे रूप अष्टभुजेचे आहे. तसे ते साकारताना उत्पादक श्रमातील स्त्रीचा वाटा पुरुषापेक्षा आठ पट जास्त होता. अष्टभुजेच्या हातातील हत्यार बघितली तर ती येथील स्त्री (किमान शूद्रवर्णातील स्त्री) उत्पादनासोबतचं समाजाचं नेतृत्व करताना युद्धात किंवा इतर कार्यात पुरुषांच्या बरोबरीने असल्याचे दिसते. इथला समाज मूलत: हा मातृसत्ताक होता. त्रिवर्णाने पितृसत्ता लादण्याचे केलेले प्रयत्न त्रिवर्णातील स्त्रियांनीसुद्धा सहजासहजी स्वीकारले असे दिसत नाही. रामायण-महाभारतातील स्त्री-पुरुष संघर्ष हे साहित्यातील एक रूप झाले. बुद्धाने भिख्खू संघ स्थापन केल्यानंतर त्यात स्त्रियांना घेतले नाही, त्या विरोधात त्याच्या आईने आणि पत्नीने विद्रोहाचे निशाण फडकवले.

मध्ययुगात दक्षिणेत सातव्या शतकात इस्लामच्या आगमनानंतर व उत्तरेत नवव्या ते अकराव्या शतकाच्या दरम्यान होत राहिलेल्या तुर्कांच्या स्वाऱ्यामुळे व नंतर तुर्क दिल्लीवर राज्य करायला लागल्यामुळे दक्षिणेतल्या चोल राजांनी आग्नेय आशियात आपल्या साम्राज्यांच्या केलेल्या विस्तारानंतर एक उत्पादन व्यवस्था म्हणून

■

कॅथलिक प्रारूपाच्या धर्तीवर आपल्याकडे हिंदुत्वाचे मोनोलिथ उभे करण्याचे प्रयत्न होत राहिले व होतायत. यासाठी उभ्या राहिलेल्या आरएसएसपासून शिवसेनेपर्यंतच्या सर्व संघटनाचे स्वरूप रोमन-कॅथलिक चर्चसारखे पोपकेंद्रीत राहिले आहे.

------

जातिव्यवस्थेचा अधिकाधिक विस्तार होत गेला. तुर्कस्तानपासून ते इंडोनेशियापर्यंत संपूर्ण पश्चिम आशिया व आग्नेय आशिया या भागात तंत्रज्ञान समताधिष्ठित धर्म संकल्पना, गणित, अवकाशशास्त्र इत्यादी एकात्मिक विकास होत असल्याचे दिसते. शेतीकेंद्रीत, शेतिपूरक जातिव्यवस्थेबरोबरच कापड व्यवसाय केंद्रीत धातूंशी निगडित भू-जल, वाहतूक व्यवसाय इ० व्यवसायात कौशल्य आत्मसात केलेल्या अनेक नव्या जाती या काळात विकसित होत गेल्या. त्रिवर्णातील काही जातींचा अपवाद वगळला तर वर उल्लेखलेल्या सर्व व्यवसायातील उत्पादक जातींमध्ये त्या-त्या तंत्र व कौशल्याचा वापर करताना स्त्री-पुरुष विषमतेला, भेदाला स्थान नव्हते. म्हणून ज्यांचा उल्लेख आज आपण बहुजन समाज असा करतो, त्या बहुजन जातीतील स्त्रियांना आपापल्या जातीमध्ये उत्पादनव्यवस्थेतील त्यांच्या स्थानामुळे व्यक्तिमत्त्व व व्यक्तित्त्व विकसित करण्यासाठी पैस उपलब्ध होता. म्हणून युरोपसारख्या स्वातंत्र्याचा औपचारिक भास व खरेखुरे स्वातंत्र्य अशा विरोधाभासाला भारतीय समाजात फारसा वाव नव्हता.

१९ व्या २० व्या शतकातील ज्योतिबा-सावित्री फुले, मोहनदास करमचंद गांधी, विठ्ठल रामजी शिंदे, अण्णा भाऊ साठे यांचा अपवाद वगळता इंग्रजीसाक्षर नव्या वर्गाने मग ते स्वत:ला उजवे म्हणोत किंवा उदारमतवादी म्हणोत की विवेकवादी म्हणोत की डावे वा कम्युनिस्ट म्हणोत, या भारतीय वा आशियाई वास्तवाची नोंद घेण्यास जाणते-अजाणतेपणे नकार दिला. परिणामी, या इंग्रजीसाक्षर वर्गाने केलेल्या सर्व स्तरावरील सुधारणांच्या चर्चा या कायम आभासी राहिल्या, परंतु त्याचा दृश्य परिणाम म्हणून लोकशाहीच्या आपण स्वीकारलेल्या संसदीय परिघापर्यंत बहुजन स्त्रिया पोहचू शकल्या नाहीत.

वर उल्लेखलेल्या उजव्या उदारमतवादी, डाव्या समाजवादी-मार्क्सवादी इ. सर्व वैचारिक प्रवाहांचे नेतृत्व एकाच जातवर्ग समूहातून आलेले होते. इंग्रजांच्या लुटीच्या धोरणांचा फायदा घेऊनच या समूहातील जाती वर्गामध्ये बदललेल्या होत्या. इंग्रजी शिक्षणाने त्यांच्या जाणिवांच्या कक्षा युरोपकेंद्री व युरोपपुरत्या मर्यादित झालेल्या होत्या. या प्रवाहांनी त्यांच्या त्यांच्या वैचारिक आधाराने वेगवेगळ्या संघटना उभ्या केल्या, तरी त्या संघटनांची चौकट रोमन-कॅथालिक चर्चने उभ्या केलेल्या एक चालकांनुवर्ती अशीच राहिलेली आहे. कॅथलिक प्रारूपाच्या धर्तीवर आपल्याकडे हिंदुत्वाचे मोनोलिथ उभे करण्याचे प्रयत्न होत राहिले व होतायत. यासाठी उभ्या राहिलेल्या आरएसएसपासून शिवसेनेपर्यंतच्या सर्व संघटनाचे स्वरूप रोमन-कॅथलिक चर्चसारखे पोपकेंद्रीत राहिले आहे. पोपच्या निवडीची प्रक्रिया व सरसंघचालकांच्या निवडीची प्रक्रिया यामध्ये कमालीचे साम्य आहे. हिंदुत्वाप्रमाणेच इस्लामचेदेखील मोनोलिथ उभारण्याचे प्रयत्न जमात ए इस्लामच्या नावाने मौलाना मौदुदिने सुरू केले. ते करताना त्यांनी इस्लामची बहुकेंद्रीत मुळरचना नाकारून कॅथलिक चर्चच्या धरतीवर एकजिनसी - एकचालकावरती संघटनेचे प्रारूप स्वीकारले. हिंदुत्व आणि इस्लामचे मोनोलिथ उभे करताना चर्चप्रमाणेच नेतृत्वाच्या उतरंडीत स्त्रिया कुठेही असणार नाहीत, याची काळजी रोमन कॅथालिक चर्चप्रमाणे त्यांनीही घेतली होती. ज्या जात-वर्गाच्या समूहाने हिंदुत्व व इस्लामचे मोनोलिथ उभं करण्याचा

प्रयत्न केला, त्यातील स्त्रियांचा उत्पादक श्रमांशी संबंध नव्हता. त्यामुळे त्यांना पुरुषसत्तेला आव्हान देण्याची परंपरा नव्हती. या जातसमूहातील स्त्री-समूहानेदेखील मडमीकरणाच्या चौकटीतील त्यांच्या पुरुषांना भावलेल्या स्त्री सुधारणांच्या चौकटी स्वीकारल्या. लोकहितवादींपासून -आगरकरांपर्यंत सर्वांनी स्त्री सुधारणेचा प्रयत्न केलेला आहे. ती सुधारणा करताना पुरुषसत्तेचं उदारमतवादी उदात्तीकरण होईल, असा प्रयत्न करायला ते विसरलेले नाहीत. याउलट ज्या जात-समूहातील स्त्रियांचा त्या-त्या जातींच्या उत्पादनात पुरुषांइतकाच किंवा कणभर जास्तच शारीरिक व बौद्धिक श्रमाचा सहभाग आहे, त्या जातींतून आलेले ज्योतिबा फुले-स्त्रीपुरुष समानतेचा आग्रह करताना दिसतात. त्यामुळे सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे आदींसारखे स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरणारे नेतृत्व विकसित होताना दिसते.

भारतीय समाजातील सर्वांगीण विषमतेच्या विरोधात सर्वांगीण समतेची लढाई लढताना वर उल्लेखलेल्या पार्श्वभूमीच्या ताण्याबाण्यातील विविध प्रवाहांचे उभ्या-आडव्या धाग्यांचे आकलन व त्याचे भान यांबाबत जराही बेसावध राहून चालत नाही. असे बेसावध राहिलो की परिस्थितीतील गुंता समजावून घेण्याऐवजी आपण ती युरोपकेंद्रीत चौकटीतील औपचारिक तर्कशास्त्राच्या आधारे काळ्या-पांढऱ्या रंगात रंगवू लागतो. त्यामुळे सगळंच भासमय व्हायला लागतं. व्यवस्थेला असे भास फारच हवेहवेसे असतात. मग त्या भासाच्या चौकटीमध्ये तुम्ही कितीही विद्रोही असलात तरी व्यवस्थेला हे माहीत असतं, की तुमचा विद्रोह व्यवस्थेच्या मजबुतीकरणाला हातभार लावणाराच आहे. मग या विद्रोहीसाठी फक्त भारतीय भांडवलच नव्हे तर जागतिक भांडवलही सर्वप्रकारची मदत करायला तयार असते.

१५ ऑगस्ट १९४७ पर्यंत इंग्रज नावाचा शत्रू समोर असल्यामुळे युरोपकेंद्री विचारांनी व विचारपद्धतींनी निर्माण केलेल्या त्रासांबद्दल फारसे आकलन विकसित होण्याची परिस्थिती नव्हती. लढाई जोपर्यंत जागतिक भांडवल व देशी भांडवल अशी होती, तोपर्यंत साम्राज्यशाहीचा अंत हा समान मुद्दा होता. पण साम्राज्यशाही नसतानाचा समाज कसा असला पाहिजे, याबद्दल गांधी सोडले तर उर्वरित विविध विचारप्रवाहांना मानणाऱ्यांच्या विकासाच्या संकल्पना या युरोपकेंद्रीत भांडवली चौकटीतल्याच होत्या. ज्या चौकटीमध्ये पुरुष उदारमतवादी असतील तर ते स्त्रियांना सामावून घेणार होते. जसे समाजवाद्यांनी (पुरुषांनी) स्त्रियांना सामावून घेतले. या सामावून घेणाऱ्या दृष्टिकोनाची भाषा समतेची असली तरी समाजवाद्यांच्या व कम्युनिस्टांच्या संघटनांमध्ये नेतृत्वाच्या विविध पातळ्यांवर नेत्यांच्या नातेवाईक स्त्रियांच्या पलीकडे कोणालाही फारसे स्थान

■

पण साम्राज्यशाही नसतानाचा समाज कसा असला पाहिजे, याबद्दल महात्मा गांधी सोडले तर उर्वरित विविध विचारप्रवाहांना मानणाऱ्यांच्या विकासाच्या संकल्पना या युरोपकेंद्रीत भांडवली चौकटीतल्याच होत्या. ज्या चौकटीमध्ये पुरुष उदारमतवादी असतील तर ते स्त्रियांना सामावून घेणार होते. जसे समाजवाद्यांनी (पुरुषांनी) स्त्रियांना सामावून घेतले. या सामावून घेणाऱ्या दृष्टिकोनाची भाषा समतेची असली तरी समाजवाद्यांच्या व कम्युनिस्टांच्या संघटनांमध्ये नेतृत्वाच्या विविध पातळ्यांवर नेत्यांच्या नातेवाईक स्त्रियांच्या पलीकडे कोणालाही फारसे स्थान मिळालेले नाही.

------

■

मृणाल गोरेंची ओळख ही पाणीवाली बाई म्हणून झाली. मुंबईच्या पाणी प्रश्नाशी त्यांची ओळख जोडली गेली. पाण्याचा प्रश्न स्त्रियांचा प्रश्न असतोच. स्त्रियांशी जोडल्या गेलेल्या या प्रश्नांमुळे स्त्रियांचा नेता होणं आणि स्त्री प्रश्नाचं बहुजनवादी आकलन असल्यामुळे स्त्रियांचं नेतृत्व करणं, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. स्त्रियांशी जोडलेल्या एखाद्या प्रश्नांमुळे स्त्रियांना मोठ्या संख्येने आंदोलनात येता येईल. तो प्रश्न सुटला की आंदोलनात आलेल्या स्त्रिया आपापल्या चौकटीत परत जातात. पण स्त्री प्रश्नाचं बहुजनवादी आकलन असेल तर या व्यवस्थेत स्त्री म्हणून माझं स्थान काय? असा प्रश्न विचारत या स्त्रियांनी व्यवस्थेला आव्हान उभ केलं असतं.

------

मिळालेले नाही. उदा० अहिल्या रांगणेकर, विमल रणदिवे, या कम्युनिस्ट नेते बी० टी० रणदिवे यांच्या बहीण व पत्नी होत्या. रोझा देशपांडे ही श्रीपाद डांगे यांची मुलगी होती. प्रमिला दंडवते, मृणालताई गोरे, यासुद्धा समाजवादी परिवारातील अपत्य होत्या. वर उल्लेखलेल्या स्त्रियांचे व्यक्तिगत कर्तृत्व आदरणीय व अनुकरणीय असले, तरी ते त्यांच्या त्यांच्या पक्षामध्ये किंवा एकूणच भारतीय राजकारणामध्ये स्त्रियांचा टक्का वाढण्यात किती मदत झाली व झाली नसल्यास वर उल्लेखलेल्या युरोपकेंद्रीत भासांचा त्यांच्या विचारांवर व विचारपद्धतींवर असलेल्या प्रभावामुळे व्यक्ती म्हणून त्या कितीही श्रेष्ठ असल्या तरी भारतातील बहुजन स्त्रियांशी त्यांची नाळ जोडू शकल्या नाहीत. मृणाल गोरेंची ओळख ही पाणीवाली बाई म्हणून झाली. मुंबईच्या पाणी प्रश्नाशी त्यांची ओळख जोडली गेली. पाण्याचा प्रश्न स्त्रियांचा प्रश्न असतोच. स्त्रियांशी जोडल्या गेलेल्या या प्रश्नांमुळे स्त्रियांचा नेता होणं आणि स्त्री प्रश्नाचं बहुजनवादी आकलन असल्यामुळे स्त्रियांचं नेतृत्व करणं, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. स्त्रियांशी जोडलेल्या एखाद्या प्रश्नांमुळे स्त्रियांना मोठ्या संख्येने आंदोलनात येता येईल. तो प्रश्न सुटला की आंदोलनात आलेल्या स्त्रिया आपापल्या चौकटीत परत जातात. पण स्त्री प्रश्नाचं बहुजनवादी आकलन असेल तर या व्यवस्थेत स्त्री म्हणून माझं स्थान काय? असा प्रश्न विचारत या स्त्रियांनी व्यवस्थेला आव्हान उभ केलं असतं. जिथे डाव्या पक्षातल्या लोकप्रिय नेतृत्वाला असे प्रश्न पडले नसतील, तर या पक्षातल्या पुरुषांना असे प्रश्न पडण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. युरोपकेंद्री पद्धतीने विचार करणारे हे सगळे स्त्री नेतृत्व हिरीरीने आठ मार्च साजरा करत असतात. ते करताना रोझा लक्झंबर आणि क्लारा झेटकीन या दोन जर्मन कम्युनिस्ट नेत्यांनी स्त्री प्रश्न करताना तो इश्यू म्हणून उभा केला नव्हता तर विषमतावादी व्यवस्थेच्या विरोधातील धोरणात्मक प्रश्न म्हणून उभा केला होता, हे भान आहे का?

उजव्या व मध्यमवर्गीय पक्षांचं व डाव्या पक्षाचं स्त्री प्रश्नांबद्दलचं आकलन मोर्चात व सभेला किती स्त्रिया सहभागी झाल्या, याच्या पलिकडे कधीही गेलं नाही. एखादा प्रश्न जिरवायचा असेल तर तो राखीव जागांच्या चौकटीत अडकवण्याचं एक तंत्र भारतातल्या सगळ्या पक्षांनी मिळून विकसित केलं आहे. अहिल्याताई व मृणालताईच्या पिढ्या राखीव जागांमुळे पुढे आल्या नाहीत. त्यांना त्यांच्या नात्यांचे फायदे मिळाले व त्या त्यांच्या मर्यादाही ठरल्या, हे खरे असले तरी त्यांनी त्यांचं स्थान त्यांच्या कर्तृत्वाने सिद्ध केलं होतं. हेच इंदिरा गांधींच्या बाबतीतही म्हणता येईल. आणखी नाव घ्यायची झाली तर जिल्हावार अनेक स्त्रियांची नावे घेता येतील. शालीनीताई पाटील, केशरकाकू क्षिरसागर, प्रमिला काकी चव्हाण, निर्मलाताई ठोकळ, रेणुका चौधरी, जयललिता,

ममता बॅनर्जी, वृंदा करात, सुषमा स्वराज, सुशीला गोपालन या यादीत अलिकडच्या काळातील मेधा पाटकर, प्रतिभा शिंदे इ० अशाप्रकारे आरक्षणाचा फायदा न घेता या व्यवस्थेत स्वत:चं कर्तृत्व सिद्ध केलेल्यांची यादी मोठी असली तरी अगणित नाही. राखीव जागांचे तत्त्व १९३५ सालच्या कायद्याने ब्रिटिशांनी भारतात आणले. त्यामध्ये ब्रिटिशांचा हेतू दलित-आदिवासींमध्ये इंग्रजी साक्षरतेचा प्रसार करणे व उच्चवर्णियांप्रमाणेच दलित -आदिवासींतील इंग्रजीसाक्षरांना सोईप्रमाणे उच्च इंग्रजी साक्षरांच्या अंगावर घालण्यास वापरता आले तर पहावे असा होताच या संधीचा फायदा घेऊन डॉ० बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारताच्या घटनेचा मसुदा तयार करताना राखीव जागांचे तत्त्व आदिवासी व दलित वगळून इतर मागासवर्गापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. हिंदू कोड बिलाच्या निमित्ताने हिंदू स्त्रीला पतीच्या व पित्याच्या संपत्तीत वाटा मिळण्याची तरतूद करून दलित व आदिवासींच्या सोबतीने ओबीसी स्त्रियांना उभे करण्याचा प्रयत्न केला. १९४७ च्या सत्तांतरानंतर सत्तेवर आलेल्या सत्ताधिशांची दृष्टी जर बहुजनवादी विकासाची असती तर राखीव जागांमुळे दलित, आदिवासी, भटकेविमुक्त व स्त्रियांच्या नैसर्गिक उत्पादक उर्जेचे रूपांतर एक बलाढ्य देश निर्माण करण्यासाठी झाला असता, पण तसे झाले नाही. १९४२ नंतर नेहरू, पटेल या जोडगोळीने गांधींना कालबाह्य ठरवून अडगळीत टाकून दिले व टाटा-बिर्लाने तयार केलेला बॉम्बे प्लॅन नावाचे भांडवली विकास धोरण स्वीकारले होते. याला विरोध करणाऱ्यांमध्ये जयप्रकाश नारायण व लोहियावादी, समाजवादी व डांगे रणदिव्यांच्या नेतृत्वात कम्युनिस्ट आघाडीवर होते. यापैकी जयप्रकाश नारायण समाजवादाची कास सोडून सर्वोदयवादी छावणीत दाखल झाले. लोहियांनी शूद्रातिशूद्र मागासजातीच्या स्त्री-पुरुषांचा भांडवलीसत्तेतील सहभाग हाच मुख्य अजेंडा केला. पहिल्यांदा राजकारणी उंबऱ्यावर जातींचा प्रश्न व स्त्रियांचा प्रश्न अस्मितादर्शी चौकटीत बंदिस्त केला. लेखाच्या सुरुवातीला युरोपकेंद्री संकल्पना

१९४७ च्या सत्तांतरानंतर सत्तेवर आलेल्या सत्ताधिशांची दृष्टी जर बहुजनवादी विकासाची असती तर राखीव जागांमुळे दलित, आदिवासी, भटकेविमुक्त व स्त्रियांच्या नैसर्गिक उत्पादक उर्जेचे रूपांतर एक बलाढ्य देश निर्माण करण्यासाठी झाला असता, पण तसे झाले नाही. १९४२ नंतर नेहरू, पटेल या जोडगोळीने गांधींना कालबाह्य ठरवून अडगळीत टाकून दिले व टाटा-बिर्लाने तयार केलेला बॉम्बे प्लॅन नावाचे भांडवली विकास धोरण स्वीकारले होते.

------

भारताच्या परिस्थितीवर यांत्रिकपणे लादण्याच्या प्रयत्नात कोणता विरोधाभास निर्माण होतो, याची चर्चा आपण केली आहे. जातीचा प्रश्न व स्त्रीप्रश्नाला या आभासी चौकटीत आणण्याचे सिद्धांकन करण्याचा मान हा लोहियांचाच आहे. म्हणजे कॉंग्रेस विकासाचे धोरण आभासी आणि त्याला विरोध करणाऱ्यांचे धोरणही आभासी. या भास-प्रतिभासाच्या खेळात दलितांबद्दल आदिवासींबद्दल दया असणाऱ्या स्त्रियांबद्दल करुणा असणाऱ्या व स्वत:च्याच पक्षांमध्ये स्त्रियांच्या नावाने स्वकर्तृत्वाने स्वत:चे स्थान निर्माण करण्याचा पैस समग्र उच्चवर्णीय व उच्चजातीय उदारमतवादी स्त्रियांनाच होता. बहुजन समाजामधल्या ज्या स्त्रियांची नावे अगोदरच्या यादीत आलेली आहेत, त्या बहुजन जातींत जन्माला आलेल्या असल्या तरी आहे रे वर्गातूनच आलेल्या होत्या. म्हणून त्या पुरुषसत्ता राबणाऱ्या बहुजन स्त्रियाच राहिल्या. भारतात राजीव गांधी, सोव्हियट युनियनमध्ये गॉर्बाचेव्ह, इंग्लंडमध्ये मार्गारेट थॅचर, अमेरिकेत रिगन व बुश यांच्या आगमनाने सगळ्या जगामध्ये नवे वारे वाहू लागले.

■

'आठ मार्च' या स्त्रीमुक्तीदिनावर सौंदर्यप्रसाधनं बनवणाऱ्या कंपन्यांचे वर्चस्व दिसतंय. स्त्रियांनी मुक्त होणं म्हणजे स्वत:च्या मनाप्रमाणे सजणं. मनाप्रमाणे म्हणजे अमुकतमुकच्या मनाला कसं आकर्षित करता येईल असं. परिणामी समाज व राजकारणातल्या स्त्रियांचं व्यक्तिमत्त्व, पेहराव, केशरचना हे सगळंच बदलत गेलं.

------

जागतिक भांडवलाच्या एकात्मिककरणामध्ये अडथळा म्हणून उभी असलेली 'सोव्हिएट युनियन' विरघळली व चिनी कम्युनिस्ट पक्षांनी समाजवादाला अडगळीत फेकून दिले. या केवळ त्या-त्या देशात घडलेल्या राजकीय घटना नाहीत. या घटनांनी जगाच्या अर्थकरणावर, समाजकारणावर, सांस्कृतिकीकरणावर व या सर्वांचा दृश्य परिणाम असणाऱ्या स्त्री-पुरुष नात्यांवर गंभीर परिणाम घडवले. चीनमधल्या १९४९ सालच्या क्रांतीने एका रात्रीत चीनमधला वेश्याव्यवसाय संपवून टाकला होता. चीनी कम्युनिस्ट पक्षाच्या एका आदेशाने सगळ्या अविवाहित कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी वेश्यांशी लग्न केली व त्यांना व्यक्ती केले. माणूस केले. सत्तरवर्षाच्या समाजवादाच्या काळात सोव्हियट युनियनमध्ये वेश्या व्यवसाय उभाच राहिला नाही. कारण समाजवाद शरीराला विकत घेण्यासारखी किंवा विकली जाण्यासारखी वस्तू मानत नाही. माणसाचे शरीर निसर्गाशी सकारात्मक संघर्ष करता करता मानवी समाजाला उन्नत करण्यासाठी श्रमाचे साधन मानते. याउलट भांडवलशाही शरीर हे बाईचं वा पुरुषाचं असो त्याला वस्तू मानतं त्यातही बाईचं शरीर निव्वळ वस्तूच मानलं गेलंय. दोन व्यवस्थांमधले माणसाच्या अस्तित्वाकडे बघण्याचे दोन दृष्टिकोन आहेत. जागतिकीकरण म्हणजे जगातल्या भांडवलाचे एकात्मीकरण. भांडवल संचयासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षात मानवी शरीराची गरज असते. आधी मानवी शरीराने केलेले श्रम विकाऊ असतात. श्रमशक्ती क्रयवस्तू बनते. श्रमशक्ती नावाची क्रयवस्तू विकण्याची संधी नसली तर शरीरच क्रयवस्तू बनवावे लागते. १९९० नंतरच्या यांत्रिकीकरणाने मानवी श्रमाला अडगळीत फेकून दिले. त्यामुळे श्रमशक्ती विकण्याची संधीच नसल्यामुळे आधी प्रामुख्याने स्त्रियांची आणि नंतर पुरुषांच्याही शरीरांचं वेगाने वस्तुकरण झालेलं आहे. वस्तूला बाजारात विकायचं असेल तर ती आकर्षक असली पाहिजे. शरीर नावाच्या वस्तूला आकर्षक बनवण्यासाठी मोठी इंडस्ट्री काम करते आहे. याचा राजकारणावर काय परिणाम झालाय?

'आठ मार्च' या स्त्रीमुक्तीदिनावर सौंदर्य प्रसाधनं बनवणाऱ्या कंपन्यांचे वर्चस्व दिसतंय. स्त्रियांनी मुक्त होणं म्हणजे स्वत:च्या मनाप्रमाणे सजणं. मनाप्रमाणे म्हणजे अमुकतमुकच्या मनाला कसं आकर्षित करता येईल असं. परिणामी समाज व राजकारणातल्या स्त्रियांचं व्यक्तिमत्त्व, पेहराव, केशरचना हे सगळंच बदलत गेलं. मनाप्रमाणे सजणं म्हणजे कोणाच्या तरी मनासाठी सजणं.

सत्ता हीसुद्धा आता क्रयवस्तू आहे. सत्ता हा शब्द 'स्त्री लिंगी' असला तरी त्याचा आशय पुरुषलिंगी आहे. सत्ता ही पुरुषाची असते. सत्तेत बाईने जायचं असलं तरी ती बाई पुरुषांना आवडणारी तरी हवी किंवा पुरुषांसारखी वागणारी तरी हवी. 'इंदिराजींच्या मंत्रिमंडळात त्या एकमेव पुरुष आहेत' असं बोललं जायचं. असं चेष्टेने सांगणाऱ्यांच्या मनात इंदिरा गांधी बाई होत्या का? या वाक्यात दोन अर्थ आहेत. एक विषादाचा- बाई असूनही पुरुषांची सत्ता चालवते. दुसरा हे टाळण्याचा - बाई असूनही बाईसारखी वागत नाही. असे बोलणाऱ्यांमध्ये संघवाले फार पुढे होते. पण नंतरच्या काळात संघाच्या सोबत गेलेल्या 'जॉर्ज फर्नांडिसांचे अनुयायीही काही मागे नव्हते, आजूबाजूला बाई नाही असं बघून कम्युनिस्ट पक्षातही अशा चर्चा चालायच्याच! राजकारणातील

कदाचित एकही बाई की जीने पुरुषांना खूष करण्यासाठी काहीही केले तरी तीचं राजकारणात असणंच खुपत नाही. अलीकडच्या काळात राजकारणात जाणाऱ्या स्त्रियांनी 'पुरुषाची सत्ता' अशी सत्तेची संकल्पना मनोमन स्वीकारून टाकलेली दिसतेय फेटे-टोप्या ही पुरुषसत्तेची प्रतीकं राजकारणातील स्त्रियांच्या माथ्यावर चढताहेत, हे पुरेसे बोलक आहे.

यापुढील काळात, खरं म्हणजे गेल्या वीस-पंचवीस वर्षांत समाजाकडे समग्रपणे न पाहता सुटं-सुटं करून पाहण्याची प्रवृत्ती जाणीवपूर्वक वाढवली गेली आहे. ऐंशी-नव्वदपर्यंतच्या काळात साम्यवाद-समाजवाद-गांधीवाद अगदी फुले-आंबेडकरवाद, अराजकवाद, अस्तित्ववाद या प्रत्येक वादाची घडण वेगवेगळी असली तरी त्याच्यात एक साम्य होतं- ते समाजाचा समग्रपणे विचार करत होते. पंच्याहत्तर सालापासून ही परिस्थिती बदलली. आधी स्त्रीवाद, दलितवाद मग बहुजनवाद या सर्व वादांनी आपापल्या घटकांपुरता विचार करायला सुरुवात केली. आपापल्या घटकांवर उरलेल्याकडून अन्याय झालाय हे पटणं सोपं असलं तरी त्यामुळे विषमतेचा व त्या विषमतेमुळे होणाऱ्या अन्यायाचा, मुळाशी जात विचार करून आमुलाग्र परिवर्तनाची चर्चा करणं खंडीत झालं. आधी समूहाचं 'खंडीत्व' आणि त्या प्रत्येक समूहाच्या बारीक-सारीक प्रश्नांची सुटी सुटी मांडणी करून जणू काही तेवढाच प्रश्न महत्त्वाचा आहे असे निर्माण करण्याचे संघटित प्रयत्न एनजीओच्या नावाने केले जात आहेत. पूर्वी परिवर्तनवादी पक्षाच्या स्त्री किंवा पुरुष कार्यकर्त्यांचं जगणं हे उघड्या पुस्तकासारखं होतं. ते लोकांच्यात राहायचे. लोकांनी दिलेलं खायचे. ते लोक व ते कार्यकर्ते यांचे एक जैविक नातं होतं. आता एनजीओची ऑफिसेस असतात. समाजकार्य शिकवणाऱ्या कॉलेजमधून डीग्र्या घेऊन बीएसडब्लू, एमएसडब्लू सारख्या मोठमोठ्या पगारांवर मोटरसायकली, जीपा, अशा थाटात कार्यकर्ते लोकांचे प्रश्न सोडवायला जाताहेत.

आता अशा विदेशी पैशांवर चालणाऱ्या गरिबीचाही मेक्‌प केलेल्या सगळ्या एनजीओज् सत्ता ताब्यात घेण्यासाठी राजकीय पक्ष बनून उतरल्या आहेत. यात स्त्रिया कुठे असतील?

■

सी १३, कुणाल प्लाझा,
स्टेशन रोड, चिंचवड,
पुणे ४११ ०१९

---

## येथें तुमचा जीव कोठें जातों?

अरें, तुह्मी म्हणतां ना कीं, आपल्या जिवावरून दुसऱ्याचा जीव जाणावा. मग येथें तुमचा जीव कोठें जातों? तुमचा जीव जसा तुह्माला प्यारा आहे, तसा स्त्रियांचा त्यांना नसेंल काय? स्त्रिया दुसऱ्या मातीच्या, दगडाच्या नाहींत तर लोखंडाच्या बुकणीच्या केल्या असतील? तुह्मी व तुमचा जीव हें अगदी गाळीव सोनं स्त्रिया काय अगदी य:कश्चित् प्राणी, ढेंकूण नाहीं तर पिसू, असें तुह्मांला वाटतें? व हें तुमचे अनुभवाप्रमाणें अगदीं बरोबर आहे. कसें जर ह्मणाल, तर पतिराज एकदां स्वर्गवासी झाले ह्मणजे या बाईसाहेबांचे हाल कुत्रे खात नाहींत, त्यांच्या कपाळीं मग काय? माथ्यावरील एकदां सर्व केस कुरुळे केसांवर नापिकाचा हात फिरला म्हणजे तुमचे डोळे थंड झाले. सर्व अलंकार गेले. सुंदरपण गेलें. सारांश, तिला सर्व तऱ्हेनें उघडी करून देशाधडी केल्याप्रमाणें नागवून सांदीचे खापर करावयाचे. तिला कोठें लग्नकार्यांत, सभारंभांत, जेथे कांहीं सौभाग्यकारक असेल तेथें जाण्याची बंदी.

■

- **ताराबाई शिंदे** कृत **स्त्रीपुरुषतुलना**
संपादक : डॉ० स० गं० मालशे, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई. १९७५.

सगुणा

लेख

# तिला निर्णय घेऊ द्या

सौ० श्रीलेखा प्रकाश पाटील

आजचा समाज प्रगत होतोय, अत्याधुनिक होतोय हे आनंददायीच आहे. पण तंत्रज्ञानाचा स्फोट होऊन समाज सुंदर आणि सुसंस्कृत होत नाही. समाजाला आणि त्यातही प्रामुख्याने महिलेला चिकटलेल्या रूढी-परंपरा तिचं जीवन कुरूप करू पाहणाऱ्या अनिष्ठ प्रथा समूळ नष्ट झाल्या पाहिजेत. यासाठी आपल्याला कुणीतरी येऊन काहीतरी समत्कार घडवेल हा विचार समाजातील तळागाळातील प्रत्येक महिलेने बाजूला ठेवून स्वत: स्वत:च्या कर्तृत्वाची दोरी हातात घेणे आज काळाची गरज बनली आहे. तरीदेखील आज आपण समाजात डोकावले असता स्त्रियांच्या हाती सत्ता आलेली दिसत आहे. परंतु कारभार मात्र पतीराज हाकत असल्याचे दिसत आहे. त्यासाठी आजच्या स्त्रियांनी सुसंस्कारित उच्चशिक्षित, कर्तृत्ववान, स्वावलंबी, धाडसी, होण्याची गरज आहे. देशाला समृद्ध करण्यासाठी चूल आणि मूल ही संकल्पना बाजूला सारून समाजाच्या उन्नतीसाठी आजच्या स्त्रीने शिक्षक, आयपीएस, वकील, डॉक्टर, समाजप्रबोधक, व्यवसाय, राजकारण यांमध्ये सक्रीय सहभाग घेण्याची गरज आहे.

आज समाजात वाढत असलेल्या स्त्री-भ्रूण हत्या थांबवण्याचे काम फक्त स्त्रीच करू शकते. त्यासाठी

■

राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, कल्पना चावला, सुनिता विल्यम, किरण बेदी, पीटी उषा यांसारख्या असंख्य कर्तबगार महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. आजच्या ग्रामीण महिलांनीसुद्धा मागे न राहता उच्चविद्याविभूषित होऊन समाजात आपले स्थान पक्के केले पाहिजे.

ग्रामीण भागात 'मुलगी वाचवा' हा संदेश घरोघरी पोहचवला पाहिजे. आजची स्त्री आपल्या दैनंदिन जीवनात, समाजात वेगवेगळ्या भूमिकेत वावरत आहे. पण त्या पलीकडे विचार करून समाजातील शोषित व पीडित स्त्रियांना जागरूक करून बरोबरीने काम करण्याची गरज आहे.

आजच्या महिलेने सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात तिची प्रतिमा सिद्ध केलेली दिसून येते. राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, कल्पना चावला, सुनिता विल्यम, किरण बेदी, पीटी उषा यांसारख्या असंख्य कर्तबगार महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. आजच्या ग्रामीण महिलांनीसुद्धा मागे न राहता उच्चविद्याविभूषित होऊन समाजात आपले स्थान पक्के केले पाहिजे.

आज आपण ग्रामीण भागात पाहतो की मुलीच्या शिक्षणाची परवड आहे. ग्रामीण भागात महिलांची हेळसांड होत असून अंधश्रद्धेत अडकलेल्या महिलांना जागृत करून शिक्षणाच्या प्रवाहात आणले पाहिजे. त्यामुळे गावोगावी महिला बचतगटाच्या संख्येत वाढ होईल. घरगुती उद्योग वाढतील, स्त्रीभ्रूण हत्या थांबतील.

शासनाच्या विविध योजनांची समज घेऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे. दरवर्षी महिलादिन केला जातो, परंतु नुसता साजरा करण्यापेक्षा त्यांच्या उन्नतीसाठी कोणत्या घटकाची आवश्यकता आहे, असा विचार केला पाहिजे. तरच आजच्या स्त्रीचे सबलीकरण होईल. ती खंबीरपणे प्रत्येक संकटाचा सामना करू शकेल. तिला प्रत्येक निर्णयप्रक्रियेत बरोबरीने स्थान मिळेल. तरच महिलादिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्राने आतापर्यंत अनेक महापुरुष व राजमाता या देशाला दिल्या आहेत. त्यांच्या विचाराने फक्त आपल्या देशातच नव्हे तर जगात सामाजिक क्रांती घडून आली आहे. महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, तिचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी आतापर्यंत अनेक पक्षांचा, सामाजिक व स्वयंसेवी संस्थांचा, राष्ट्रपुरुषांचा, सिंहाचा वाटा आहे. मात्र, खऱ्या अर्थाने स्त्री बरोबर धावली तरच हा रथ पुढे जाऊ शकतो व संसाराची प्रगती होऊ शकते. त्याकरिता प्रत्येक कुटुंबातील स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने शिकली पाहिजे.

प्रत्येक निर्णयात तिचा विचार घेतला गेला पाहिजे. तो घेतला तरच घरची परिस्थिती सुधारू शकतो. त्यामुळे प्रत्येक कुटुंबात मुला-मुलींत भेद न करता त्यांना विकासाच्या समान संधी दिल्या पाहिजेत. सावित्रीच्या आम्ही लेकी, त्यांना शिकू द्या. मुलींना शिक्षण देऊन उभे करा. त्यांचा मानसन्मान करा. कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत तिचा विचार ऐकून घ्या. तिला निर्णय घेऊ द्या. ■

पं० समिती सदस्या,
माळशिरस, जि० सोलापूर

सगुणा

इचारात सगुणा

# ...सामूहिकतेचा बळी गेला आहे

गोष्ट माझ्या लहानपणीची आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत गावी गेलो की एक वेगळंच जग समोर यायचं. उन्हाळ्याची सुट्टी म्हणजे आंब्यांचा मोसम. आमच्या खानदेशात उन्हाळा म्हणजे त्या काळात आमरस आणि खापरावरच्या पुरणपोळ्या असं पक्कं समीकरण असे! आज हे चित्र बदललंय. खापरं आता आभावाने आढळतात. आंबे सगळे शहरांच्या बाजारात-मॉलमध्ये गेले आहेत. त्या काळातील उन्हाळ्याची आणखी एक विशेष आठवण म्हणजे लग्नसराई. सुट्टीत गावी आलेल्या माझ्यासारख्या शहरात वाढणाऱ्या मुलांसाठी खेड्यातली लग्न म्हणजे कुतूहलाचा विषय असे. सकाळी सकाळी गावातला न्हावी आजोबांच्या घरासमोर उभा राहून भेर नावाचं जुन्या लाऊडस्पीकरसारखं तोंड असलेलं सहासात फुटी वाद्य फुंकायचा. त्या वाद्याची एक ताण संपवली की मग ओरडून सांगायचा- ''अमुकतमुक ना घर लगीन शे चुलाले न्यवंत शे.''

मग आजोबा सगळ्या नातवंडांना सोबत घेऊन आपापली ताटवाटी, पाण्याचा तांब्या, फुलपात्री घेऊन लग्नाला निघायचे. लग्नात जेवणासाठी आमरस-पुरणपोळीचा बेत असायचा. कटाची आमटी, कुरडयापापडया, भजी असा थाट असायचा.

स्वयंपाकासाठी आजच्यासारखे आचारी नसायचे. खापरपोळ्या गावातल्या स्त्रिया करायच्या, तर बाकीचा सगळा स्वयंपाक पुरुष करायचे.

आजच्यासारखं वधूकडची पन्नास व वराकडची पन्नास माणसंच बोलवायची असली काही भानगड नव्हती. जेवणाचं कॉन्ट्रॅक्ट नव्हतं. लग्न कुणाचंही असो आख्खं गाव त्याला उत्सवाचं स्वरूप द्यायचं. तो सगळ्या गावाचा उत्सव असायचा. हिवाळ्यातली दादर (शाळू-ज्वारी) काढून झाली की नांगरणी, वखरणी करून शेतकरी कुटुंब मोकळी व्हायची. मग मे महिन्याच्या पेरण्या होईपर्यंतचा दोन-अडीच महिन्यांचा काळ म्हणजे लग्नसराईचा काळ. आख्खं गाव त्यात इन्व्हॉल असायचं. म्हणजे शेतकरी, बलुतेदार, वतनदार, दुकानदार-व्यापारी, शिंपी, सोनार, न्हावी व लग्न लावणारे गुरव या सगळ्यांची फार लगबग असायची. लग्न गोरजमुहूर्तावर! या मुहूर्ताची पण एक भानगड असायची. गो म्हणजे गाय; रज म्हणजे धूळ! दिवसभर रानात चरून गावाकडे निघालेल्या गुरांच्या पायांनी-खुरांनी उडालेली धूळ खाली बसेपर्यंतचा काळ म्हणजे गोरजमुहूर्त. ही उडालेली धूळ उन्हाळ्यातल्या सुसाट वाऱ्यामुळे कधी बसेल याचा काही नेम नसायचा. त्यामुळे संध्याकाळी सहा वाजल्यापासून वधु-वराकडच्या मानकऱ्यांचे रुसवे-फुगवे, मानपान, मारामाऱ्या असं सगळं सुरळीत किंवा धुसफुसत पार पडेस्तोवर लग्न काही लागायची नाहीत. आणि लग्न लागल्याशिवाय जेवण काही मिळायचं नाही.

जेवण झालं की कंदलाच्या व पेट्रोमॅक्सच्या उजेडात न्हावी उभा राहायचा आणि मग आहेर वाजवणं सुरू व्हायचं, आहेर बहुतेक एक रुपया असायचा. अमुकतमुक पाटलाचा एक रुपया, अमुक देशमुख/रावसाहेबाचे दोन रुपये, विष्णू बामणाचे चार आणे, अमुकतमुक लोहाराचे आठ आणे, अशी झोप येईस्तोवर आहेर वाजवणं आम्ही ऐकत असायचो. त्यातच मधूनच केव्हातरी मानाच्या लुगड्यावरून किंवा टोपी-टॉवेलवरून जोरदार कल्ला सुरू व्हायचा. पन्नास वर्षांपूर्वी बैलगाडीच्या चकारीशिवाय रस्ते नव्हते. काही जिल्ह्याच्या ठिकाणांपर्यंत कशीबशी वीज पोहचलेली होती. मला आठवतंय, सैन्यातून रिटायर होऊन आलेल्या आमच्या गावातल्या एकाने सायकलीला बॅटरीवर चालणारा दिवा बसवलेला. अंधारात त्याची सायकल येताना तो दिवा प्रखरपणे पेटायचा आणि तो पेटलेला दिवा बघण्यासाठी आख्खं गाव धाब्यावर, आपापल्या घराच्या कट्ट्यावर उभं असायचं. अशा त्या गावामध्ये जिथं रेडिओही पाहायला मिळत नव्हता, तिथं लग्न, जावळ काढणं, नवस फेडणं, जत्रा, उरुस, तमाशा हीच करमणुकीची साधनं होती. एरवी स्त्री-पुरुषांना लग्नादी समारंभातील मानपान हेच स्वतःच्या अस्तित्वाचा ठसा उमटवण्याचं माध्यम होतं. त्यामुळे ती संधी साधायला प्रत्येकजण आतुर असायचा. लग्नाच्या पत्रिकाही गमतीदार असायच्या- ''अमुकतमुकचा मुलगा व अमुकतमुकची मुलगी यांचा शरीरसंबंध करणे आहे.'' अशी त्या वेळची पत्रिका असायची. पत्रिका छापणारे बहुधा तालेवार देशमुख-देशपांडेच असायचे.

इतरांच्या लग्नाची आमंत्रणं चिठ्ठ्या वा पोस्टकार्ड किंवा न्हावी यांच्यामार्फत जात असत. आमंत्रण फक्त लग्नाचंच असायचं. पहिल्यांदा होते ते लग्न, दुसऱ्यांदा होणाऱ्या शरीरसंबंधाला 'पाट लावणं' किंवा 'म्होतूर लावणं' म्हणतात. लग्नाचा जसा एक उत्सव असायचा, तसा पाट लावणं किंवा म्होतूराचा नसायचा. पाट किंवा म्होतूर हे भावकीतच उरकून घेतले जायचे.

माझे आजोबा एक अफलातून व्यक्तिमत्त्व होतं. ते अत्यंत श्रद्धाळू होते. त्यांना ओळीने सात मुली होत्या. सातव्या मुलीनंतर त्यांनी घरातला देव्हारा देवासकट उचलून उकिरड्यावर नेऊन टाकला. आधी ते कबीरपंथी झाले व नंतर सत्यशोधक! गावातल्या सगळ्या मुली व अस्पृश्यांची मुलं त्यांनी शाळेत घातली. साल १९३०-३५ असेल. धर्म नावाच्या गोष्टी कोणाच्या डोक्यातही नव्हत्या. हसन बागबान, अब्दुल करीम तांबोळी, फारुक हे माझे मामा होते. अशी अरबी, तुर्की नावं असणारी माणसं आपली मामा कशी? असला सेक्युलर प्रश्न पडावा, असं सामाजिक

■

प्रत्येक भाऊबीजेला किंवा राखीपौर्णिमेला आईकडून ओवाळायला मामा हजर असायचे. त्या आड त्यांचा इस्लाम येत नव्हता. एक कुणबी-पाटलाची लेक तिच्या बागबान, खाटीक-तांबोळी भावांना ओवाळीत असे. शेती केंद्रित उत्पादनव्यवस्थेने निर्माण केलेली ही नाती होती. शेतीशी असलेलं नातं जसजसं धुसर होत गेलं, तसतसं ही नातीदेखील धुसर होत गेली. नाती धुसर होण्यामुळे निर्माण झालेल्या पोकळीत धर्माच्या नावानं अभिनिवेशी अस्मिता स्थिरावली.

------

पर्यावरण त्या काळात अस्तित्वात नव्हतं. चौदाव्या वर्षी लग्न होऊन माझी आई मुंबईला आली. मुंबईत नोकरी करणाऱ्या माणसाची लग्न झालेली ती पहिली मुलगी होती. म्हणून आख्खं गाव तिला मुंबईवाली म्हणायला लागलं. आजही तिची गावातली ओळख मुंबईवाली अशीच आहे. तिच्या पाठोपाठच वर उल्लेखलेले सारे मामा कुणी बस कंडक्टर, कोणी शाळा मास्तर, कोणी पोस्टमास्तर, तर कोणी कारकून म्हणून मुंबईला आले. प्रत्येक भाऊबीजेला किंवा राखीपौर्णिमेला आईकडून ओवाळायला मामा हजर असायचे. त्या आड त्यांचा इस्लाम येत नव्हता. एक कुणबी-पाटलाची लेक तिच्या बागबान, खाटीक-तांबोळी भावांना ओवाळीत असे. शेती केंद्रित उत्पादनव्यवस्थेने निर्माण केलेली ही नाती होती. शेतीशी असलेलं नातं जसजसं धुसर होत गेलं, तसतसं ही नातीदेखील धुसर होत गेली. नाती धुसर होण्यामुळे निर्माण झालेल्या पोकळीत धर्माच्या नावानं अभिनिवेशी अस्मिता स्थिरावली.

मी सातवीत असताना उन्हाळ्याच्या सुट्टीत गावी गेलो. गावात एक भगत उतरलेला होता. गावातल्या व आजूबाजूच्या गावातल्या अंगात आलेल्या बाया घुमतघुमत या भगताकडे येत होत्या. गावकऱ्यांना फुकटची करमणूक. माझ्मा मनात कुतूहलमिश्रित भ्रम. आजोबांनी बहुधा ते ओळखलं असावं. माझ्या मनातल्या भ्रमाची दखल घेत ते मला घेऊन भगतावर चालून गेले. एका हातात सोटा व दुसऱ्या हातात भगताचे लांब केस...त्यांनी भगताला आव्हान दिले - ''करणी करून मला मारून दाखव.'' चोवीस तासांची मुदत दिली. चोवीस तासाने आजोबा पुन्हा भगतासमोर हजर- ''मला मारलं नाहीस'' म्हणून. भगत गयावया करत पायावर पडला. गाव सोडून निघून गेला. अंधश्रद्धा निर्मूलनाचा पहिला प्रत्यक्ष धडा आजोबांनी गिरवून घेतला. मात्र आज त्याच गावात अंधश्रद्धेने हैदोस घातला आहे. आसारामपासून-कलावतीदेवीपर्यंत सगळे बुवा-बाबा आमच्या गावात ठाण मांडून बसले आहेत. सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, वेगवेगळ्या पदांवरचे नोकरशहा ''बाळुमामाच्या मेंढ्याचे आशीर्वाद'' घ्यायला रांगेत उभे आहेत.

आजोबा १९७४ मध्ये वारले. तोपर्यंत आपल्या जमिनीपासून तुटलेली, आपापल्या उद्योगापासून बेदखल झालेली व शहरात जाऊन नोकऱ्यांना चिकटलेली बहुजन साक्षरांची पिढी स्थिरावली नव्हती. हरितक्रांतीमुळे बाजारपूरक पीकपद्धतीतून आलेल्या सुजेमुळे कुणबी, माळी, धनगर पुरेसे ऐटित नव्हते. भ्रष्टाचार होता, पण तो शिष्टाचार झाला नव्हता. आणीबाणी नंतरच्या काळात जयप्रकाश नारायणांनी संघपरिवाराला सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा मिळवून दिल्यानंतर भ्रष्टाचार, शिष्टाचार होत गेला. शहरात स्थिरावलेल्या या शिष्ट मंडळींनी गावागावांतल्या जुन्या देवळांच्या जिर्णोद्धाराच्या निमित्ताने गावच्या समाजकारणात व राजकारणात वर्ग म्हणून आपले हस्तक्षेप बळकट करायला सुरुवात केली. या वर्गाच्या खांद्यावर बसूनच 'वाण्याबामणाचा पक्ष' असं हेटाळणीच्या सुरात ज्याच्याबद्दल म्हटलं जायचं तो जनसंघ- भाजप या नव्या नावाने गावागावांत पोहचला. त्याच्यासोबत भाजपला रोखण्यासाठी 'आदरणीय' शरद पवारसाहेबांनी 'शिवसेना'

पोहचवली.

या सगळ्या प्रक्रियेमध्ये माझी कुणबी-पाटलाची लेक असलेली आई 'हिंदू' कधी झाली व तिला भाऊबीज घालणारा अब्दुल करीम तांबोळी-मुसलमान कधी झाला, हे त्या दोघांनाही कळलं नाही! याच काळात समाजासाठी असलेलं शेती-उत्पादन वेगानं बाजार केंद्रित होऊ लागलं. या बाजाराने नातेसंबंधाच्या केंद्रस्थानी माणसाऐवजी बाजार आणला. तुम्ही कोणत्याही मार्गाने पैसा आणावा, बाजारात तुमची पत असेल. माणसाच्या ऐवजी बाजारात त्याची 'पत'- कोणत्याही मार्गाने मिळवलेली 'पत' ही आज महत्त्वाची गोष्ट झाली आहे. त्यामुळे लग्न-नवस-जावळ-जत्रा आदी कार्यक्रमांतली सामूहिकता नष्ट झालेली आहे. त्याच्या जागी कोणत्याही मार्गाने पैसे मिळवलेल्या गावागावांतील लब्ध प्रतिष्ठेच्या व्यक्तिगत 'पत' सिद्ध करणारे किंवा प्रदर्शित करणारे कार्यक्रम झालेले आहेत.

लग्नपत्रिकांचे स्वरूप बदललं. तालुक्यातील सगळे आमदार, खासदार, पुढारी, नामदार यांनी लग्नपत्रिकांमध्ये महत्त्वाच्या जागा अडवायला केव्हाच सुरवात केली आहे. कुणीही ताटवाट्या घेऊन लग्नाला जात नाही. गावातील गुरव, न्हावी, शिंपी हे सर्व लोक विविध समारंभातून अदृश्य व्हायला लागलेली आहेत. वाजंत्रीमधून मांग अदृश्य झालेला आहे. आज जागतिक भांडवलशाहीने शेतीकेंद्रित भारतीय संस्कृतीचा सामाजिक आधार असलेल्या सामूहिकतेचा बळी घेतलेला आहे.

आपण या परिस्थितीकडे विषण्णपणे पाहत राहून इतिहासात किती छान होतं, असं म्हणत स्वत:चीच करमणूक करत राहायचं, की नव्या युगाच्या सामूहिकतेची व्याख्या करत आजची परिस्थिती बदलण्याची तयारी सुरू करायची! हा आजच्या काळातील आपल्या समोरचा मूलभूत प्रश्न आहे.

■

---

**रांडा कोण?**

आतां रांडा कोण? यांची कांही सृष्टीविरहित उत्पत्ति झाली का? का ह्या कोणी दुसऱ्या देवाने केल्या? रांडा ह्या तुह्मीच फसवून घराबाहेर काढलेल्या स्त्रियांपैकी स्त्रिया असतात. कोणतीही स्त्री कशीही असो तिला तिचे घरात किती जरी जिवासांड जाच असला तरी ती कोठें आड-विहीर करून प्राण देईन; पण बिनआधारी कोठेंच राहू शकणार नाहीं. कशी धैर्यवान असूं द्या एकटी कोणाचा जरासा आसरा असल्यावांचून ती घराचे अंगणात उभी राहणार नाही. कारण निरंतर एकाच घरांत कडक जप्तींत कोंडून राहिल्यामुळें तिच्याच्यानें बाहेर पाय टाकवणार नाही. कशीही मोठी ढालगज बेशरम असूं द्या, ती होऊन कधींही परपुरुषाचे गळ्यांत पडणार नाहीं.

रांडांची कांहीं खाण नाहीं. स्त्रियांना तुह्मी प्रथम गोडगोड बोलून, नादीं लावून, एकदा घराबाहेर घराचा उंबरा पारखा करून काढले, म्हणजे जोंवर तारुण्याचा भर असतो, तोंवर कसें तरी ढकलून नेता, नी मग तिचें नशिब तिचें बरोबर देऊन तिला सर्वस्वी नागवून सोडिता; तेव्हां ती हा निंद्य व्यापार अगदीं उघडपणे हवा तसा करून आपलेसारखी दुसरीस करूं पहाते. हें तुह्मी आपल्यावरून पहा. आपल्यासारखें सारे जगत्रय आहे, असें ज्यांचें त्यांचें मनावरून त्याला वाटतें. चोराच्या नजरेंत सारेच चोर, लबाडाला लबाड, शिंदळास सारेच शिंदळ दिसतात. याच्या उलट जे परोपकारी, धर्मशील, सत्यवादी, दयाळू, निष्कपटी, क्षमाशील आहेत, त्यांना तसेंच दिसतें.

■

- **ताराबाई शिंदे** कृत **स्त्रीपुरुषतुलना**
संपादक : डॉ० स० गं० मालशे, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई. १९७५.

सगुणा

लेख

# नातं

पूजा शिरुरकर

'नातं' हा एक पवित्र शब्द आहे. हा शब्द तयार होण्यामागचा इतिहास आपण पाहू लागलो तर आपल्याला इसपूर्व ३४०० या काळात जावं लागणार. त्या वेळी माणसांना भाषा अवगत नव्हती. फक्त शिकार मिळवायची आणि आपलं पोट भरायचं, एवढंच काय ते काम. जंगली जनावरांपासून, प्राण्यांपासून आपलं संरक्षण करणं, असा तो काळ. याच काळात माणूस वस्ती करून राहायला लागला. आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करून गुहेमध्ये तो जिथं राहत, त्या ठिकाणी आपल्या हातानं चित्र काढत होता. शिकार करणारा किंवा शिकार मिळाल्यावर आनंद व्यक्त करणारा माणूस, असे त्या चित्रांचे विषय असत. नात्याची खरी सुरुवात याच काळापासून झाली असावी, असं मला वाटतं. कारण त्या वेळी माणसं शिकारीसाठी म्हणा किंवा आपल्या संरक्षणासाठी म्हणा समूह करून राहू लागले.

नातं निर्माण होण्यामागचं कारणच मुळी हे होतं, की एकमेकांचे विचार-आचार एकमेकांना पटत असत. एखाद्या गोष्टीसंदर्भात सर्वांचे विचार घेतले जात असत, निर्णय घेतले जात असत. मग नैसर्गिकतेमुळे म्हणा किंवा निसर्गाचा नियम म्हणा 'नर' आणि 'मादी' हे एकत्र येणं होतंच. मग पुरुष-स्त्रीचे संबंध यायला लागल्यावर नात्याच्या पवित्र शब्दात अजून भर पडत गेली.

शारीरिकसंबंध आल्यामुळे मुलाबाळांचे प्रेम वाढत गेले. काही काळ लोटल्यावर मग लग्नाची परंपरा, रूढी आली. मग लग्नासाठी लोक एकमेकांना विचारू लागली. वेगवेगळी गावं तयार झाली. एका गावातील माणसं दुसऱ्या गावात जाऊ लागली. यावरून समजत असेल की नातं कशाप्रकारे वाढत गेलं. मग या नात्यांना नाव लागू लागले. उदा० काका, बाबा, आई, मामा इ० हे झालं माणसाबद्दलचं. अशाप्रकारे याहूनही दाट नातं, घट्ट नातं अजून कोणाचं असेल? तर ते म्हणजे निसर्गातील नाती. आकाशाचे जमिनीशी, वाऱ्याचे ढगाशी, पावसाचे पिकांशी असते. काहींच्या मते नाती फक्त माणसाची म्हणजे स्त्रीपुरुषांचीच असतात, परंतु माझ्या मते नातं हे प्रत्येक ठिकाणी पाहायला मिळतं. आपली नजर ज्या ठिकाणी पडेल, त्या ठिकाणी नातं हे सापडतंच.

पूर्वीचे लोक डोक्यावर गांधीटोपी घालून नमस्कार करीत असत, परंतु आजची मुलं मात्र कानामध्ये मोबाईलचे हेडफोन टाकून नमस्कार करताना दिसतात. तेही समोरच्या मोठ्या माणसानं केला तसा. कुठं गेलं ते नातं, कुठं गेले ते संस्कार. पंधरा दिवसांपूर्वी मी मुंबई ते दिल्ली प्रवास केला. जाताना अन् येताना गाडीतील एकही माणूस एकमेकांना बोलत नव्हता. याचं कारण काय तर मोबाईल. लॅपटॉप आणि टॅबलेट्स. एकमेकांना बोलत बसण्यापेक्षा लोकांना आता या गोष्टींची क्रेझ जास्त वाटत आहे. पूर्वी लोक आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्याशी संवाद करायचे, त्यामुळे ओळखी होत असत. ओळखी झाल्यानं नातेसंबंध आपोआप वाढत असत. परंतु आज हे सर्व बदलेलं दिसतं. आपल्या घराचं नातं आपल्याशी घट्ट होत जाताना आपण पाहतो. मग ती निर्जिव वस्तू का असेना. मोबाईलशी नातं किती घट्ट झालं आहे, हेही आपण पाहतो आहोत. एक दिवस मोबाईल सोबत नसेल तर दिवसभर आपलं मन लागत नाही. मोबाईल म्हणजे एक नातं जोडण्याचं साधनच म्हणावं लागेल. कारण मोबाईलमुळे आपले नातेसंबंध जास्त घट्ट करू शकलो. या वस्तू निर्जीव जरी असल्या तरीही त्या वस्तूंमुळे नातं वाढतं, ओळखी वाढतात.

■

---

**पंडितहो,**

...लिहिण्याचीच बंदी करून हे लोक धाले की काय? नाही, बाजीरावसाहेब तर काशीस जाऊन धुळीत रहवासी होऊन तद्रूप झाले. पण त्यांच्या सहवासाच्या गुणाने येथील महार तो काय? पण तोही मांगाच्या सावलीचा स्पर्श होऊ नये म्हणून प्रयत्न करीत आहे. सोवळे नेसून नाचत फिरणाऱ्या लोकाचा एवढाच हेतु की काही लोकांपेक्षा आम्ही पवित्र आहोत असे मानणे व त्यापासून त्यांस सुख वाटते. पण एका शिवण्याच्या बंदीपासून आम्हावर किती दु:खे पडतात याचा या निर्दयांच्या अंत:करणास द्रव येतो की काय? याच कारणामुळे आम्हास कोणी चाकरीस ठेवीत नाहीत. तर चाकरी मिळण्याची एवढी बंदी तर आम्हास पैसा कोठून मिळणार? बरे, हे उघडच सिद्ध होते की आमचे हाल फार होतात. पंडितहो, तुमचें स्वार्थी आपलपोटे पांडित्य पूजेसहित एकीकडे गुंडाळून ठेवा आणि मी सांगते यांजकडे लक्षपूर्वक कान द्या. ज्या वेळेस आमच्यातल्या स्त्रिया बाळंत होतात त्या वेळेस त्यांच्या घरावर छप्परसुद्धा नसतें म्हणून हीव, पाऊस व वारा यांच्या उपद्रवामुळे त्यांस किती दु:ख होत असेल बरें? याचा विचार स्वतांच्या अनुभवावरून करा. जर एखाद्या वेळेस त्यांस बाळंतरोग झाला तर त्यांस औषधांस व वैद्यास पैसा कोठून मिळणार? असा कोणता तुम्हामध्ये संभावित वैद्य होता की त्याने लोकांस फुकट औषधं दिली?

**- मुक्ता साळवे**

'मांगमहारांच्या दु:खाविषयी निबंध'

१५ फेब्रुवारी १८५५

सगुणा

## अभिप्राय

### मनाला भावणारे व विचारप्रवृत्त करणारे लेखन

'सगुणा' (जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१३) चा अंक वाचला. अंकातील अक्षराई वाचून मनास खूपच समाधान वाटले. मला वाचनाची खूप आवड आहे. मी नेहमी काव्यसंग्रह, कथासंग्रह, कादंबऱ्या, वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिक दिवाळी अंक इ० वाचत असतो. पण तुमचा हा अंक वाचल्यानंतर मला निवडक साहित्याचा एक वेगळा, पण वास्तविक विषयांचा खजिना घेऊन आलेला दर्जेदार अंक वाटला. ह्या अंकातील संपादकीयामध्ये शोभा करांडे यांनी 'शिक्षण म्हणजे काय?' सांगताना स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने ठसा उमटवत असल्या तरी आपले म्हणून त्यांना वेगळे अस्तित्व निर्माण करण्यास प्रेरित केले आहे. त्यानंतर 'विचारात'मध्ये 'प्रश्न स्त्री-शिक्षणाचा आणि बहुजन स्त्रीवादाचा', 'सृजन'मध्ये 'बहुजन स्त्रीवाद म्हणजे काय?', 'वेध'मधील 'स्त्री शिक्षणापुढील आव्हाने व भविष्याची वाटचाल' हे लेख मनाला भावणारे व विचारप्रवृत्त करणारे आहेत. त्याचबरोबर शोभा करांडे यांची कविता व डॉ० शेख इकबाल मिन्ने यांची कविता स्त्री भ्रूणहत्येसारखी ज्वलंत उदाहरणे प्रस्तुत करतात. सध्याच्या काळातील शिक्षणाची खिल्ली उडवताना 'परामर्ष'मध्ये गणपत धुमाळे यांनी स्त्री शिक्षण आणि स्त्री सबलीकरणाचे गौडबंगाल यात आजच्या शिक्षणव्यवस्थेचे मार्मिक उदाहरण दिले आहे. अनुभव, औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. शेवटी विद्या ताकवले यांनी 'नवलेखन'मधून 'शिक्षण म्हणजे काय?' सांगताना शिक्षणाचे ध्येय फक्त नोकरी मिळवणे नसून व्यक्तीचा सर्वांगीण विकास. व्यक्तिमत्त्वाचा विकास, असा संदेश दिला आहे. रिपोर्टींग वाचल्यानंतर आपण सगुणा महिला शिबिरांचे आयोजन करत आहात; वेगवेगळे प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवत आहात, ही अभिमानाची गोष्ट आहे. मा० संपादक साहेब आपण असेच नवोपक्रम राबवा आणि आपल्या अंकात अशाच प्रकारच्या वेगवेगळ्या सामाजिक प्रबोधनाचे संकलन करा म्हणजे आम्हा वाचकांना आनंद व नवज्ञान मिळेल. उत्तम अंक दिल्याबद्दल 'सगुणा'च्या संपादक, कार्यकारी संपादक व इतर सहकाऱ्यांचे आभार व भावी वाटचालीस माझ्या आभाळभर शुभेच्छा!

**- अशोक बाळू पाटील**
मु० पाचर्डे, पो० करडवाडी, ता० भुदरगड,
जि० कोल्हापूर.

## *सगुणा* : सखोल व प्रत्ययकारी चिंतन

मा० संपादक, 'सगुणा मासिक'

'सगुणा'चे दोन्ही अंक एकाच बैठकीत वाचले. आवडले. स्त्री-प्रश्नांसंबंधी सखोल व प्रत्ययकारी चिंतन या अकांतून आले आहे. निबंध स्पर्धेतील सर्व निबंध वाचनीय आहेत. अशा स्पर्धांमुळे समाजात वैचारिक प्रक्रियेला वाव मिळतो. तो आपण देत आहात, याबद्दल आनंद वाटतो. जुलै ते सप्टेंबर २०१३ या अंकातील तुमचे संपादकीय विचारांचे मोहोळ निर्माण करणारे आहे. त्याचप्रमाणे ऑगस्ट ते डिसेंबर २०१३ या अंकातील तुमची कविताही अनेक हिशोब चुकते करविणारी आहे. अंकाची निर्मितिमूल्येही उत्कृष्ट आहेत.

एकच गोष्ट नम्रतेनं निदर्शनास आणतो. एकविसाव्या शतकात वैचारिक भूमिका मांडताना टीका केली तरी अभिनिवेश नसावा आणि त्या भूमिका 'परस्पेक्टिव्ह' स्वरूपात मांडणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने याच अंकामध्ये छापलेले विठ्ठल रामजी शिंदे यांचे विचार मोलाचे आहेत. तुम्ही तुमच्या वाटेने जा.

**- डॉ० न० म० जोशी**

१०३०, 'माधवलक्ष्मी', सदाशिव पेठ, पुणे

■

## *कॉ० सोनवणे* : छेद देणारी मूलभूत मांडणी

सगुणाचे मागील काही अंक वाचले. आवडले, असं म्हणण्यापेक्षा डोकं जाग्यावर आणणारे आहेत असं मी म्हणेन. आजवर स्त्रीवाद स्त्रीवाद म्हणून जे काही सांगितलं वा पाडलं जातं त्यात कष्टकरी, शेतिनिष्ठ व शेतिपूरक उत्पादनव्यवस्थेत हाडाची काडं करणारी स्त्री कुठं आहे? जो बहुजन स्त्रीवाद म्हणून सांगितला जातो, तो खरंच बहुजन आहे? की बहुजन बहुजन म्हणून केवळ दलित वगैरे अशा एक-दोन विशिष्ट जातींपलीकडे तो केव्हा जाणार? असे काही प्रश्न डोक्यात खूप दिवसांपासून ठाण मांडून होते. परंतु 'सगुणा'चे अंक हाती पडले आणि यातील पुष्कळ गोंधळ हळूहळू सुटायला मोकळीक झाली. विशेषत: कॉम्रेड विलास सोनवणे यांच्या लेखनाने डोक्यातील ह्या गोंधळाची धूळ खाली निपचित बसवायला खूपच मोठी मदत केली.

स्त्रीवाद म्हणजे काहीतरी पुरुषविरोधी भानगड असं जे मधल्या काळात एक चित्र उभं (जाणीवपूर्वक/भ्रामक/संकुचित?) केलं गेलं, त्या चित्राला फाडून स्त्री आणि पुरुष ही दोन भिन्न टोकं कशी परस्परपूरक आहेत आणि ती वरवर भिन्न वाटणारी टोकं कुठलाही कटुभाव न निर्माण करता नीट सांधता येऊ शकतात. शिवाय बहुजन परंपरेमध्ये ही वरवर भिन्न वाटणारी टोकंही पूर्वी शेतिकेंद्रीत उत्पादनव्यवस्थेत कशी एकाच मुशीत परस्परपूरक होती, असा प्रामाणिक आशय कॉ० सोनवणे मांडतायत.

कॉम्रेड सोनवणे जो बहुजन स्त्रीवाद अधोरेखित करत आहेत, तो वास्तविक पुस्तकरूपाने शिस्तशिर पद्धतीनं पुढं यायला हवा. शेतिनिष्ठ आणि शेतिपूरक उत्पादन-व्यवसायातील स्त्रियांविषयी, त्यांच्या समस्यांविषयी, प्रश्नांविषयी आपल्याकडे फार कोणी बोलत वा लिहीत नाही. साहित्यातूनही असं स्त्री चित्रण फारसं जोरकसपणे पुढे येत नाही. नाही म्हणायला ग्रामीण साहित्यात विषयानुरूप काही लेखकांच्या लेखनात थोडंफार वाचायला मिळतं. पण तेही स्वतंत्र विषय होऊन येत नाही. अनुषंगानं येतं. भालचंद्र नेमाडे, चारुता सागर, भास्कर चंदनशिव, राजन गवस, बाबू बिराजदार, कृष्णात खोत, आदी काही मोजकेच सन्माननीय अपवाद करता येतात.

जागतिकीकरणात मूल्यव्यवस्थेचा चुथडा झाल्यामुळे आज तरुण मंडळींपुढील एकंदर गोंधळ वाढला आहे. समृद्ध सगळं सपाट होण्याचा आणि कसलीही शाश्वती नसलेला हा काळ पाहता अशा लेखनाची नितांत गरज आहे. आधीच असलेला हा गोंधळ स्वत:ला विद्वान, विचारवंत, अभ्यासक वगैरे समजणारे काही लोक आणखीच वाढवत आहेत. कसलाही अभिनिवेश न घेता या गोंधळाला छेद देणारी मांडणी कॉम्रेड सोनवणे करताहेत.

**- पांडुरंग लक्ष्मण कोळपे**

मु० पो० चिंचोली, ता० माजलगाव, जि० बीड

सगुणा

लेख

# दारूबंदी : स्त्री सामर्थ्याचे अनोखे दर्शन

डॉ० भारती पाटील

गेल्या दोनतीन महिन्यांमध्ये कोल्हापूर परिसरातील काही गावांमध्ये एक अनोखे आंदोलन होताना दिसत आहे. किणी वाठार, भादोले या गावांतील स्त्रिया दारुबंदीसाठी निकराने झुंज देत आहेत. वाठारमध्ये त्यांना अवर्णनीय यश मिळाले. आता किणी, भादोले या गावांतही स्त्रियांची एकजूट आणि संघटित झुंज यशस्वी होण्याची चिन्हे आहेत. १०-१२ वर्षांपूर्वी अशाच प्रकारचे आंदोलन वाशी गावात झाले. त्यात पार्वतीबाई माळींच्या नेतृत्वाखाली स्त्रियांनी दारुविक्रीसाठी यशस्वी संघर्ष केला आणि त्यानंतर काही गावांमध्ये त्याचे अनुकरणही झाले. वाशीच्या पार्वतीबाईंचा ठिकठिकाणी गौरवही झाला. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी आता कोल्हापूर जिल्हा आणि परिसरात दारुविक्रीबंदीसाठी स्त्रियांचा संघर्ष सुरू झाला आहे. विशेषत: किणी गावात ज्या पद्धतीने स्त्रियांनी निकराचा लढा दिला, त्यातून स्त्रियांच्याच सामर्थ्यशिलतेचे अनोखे दर्शन घडले.

वाठार हे महामार्गावरील गाव. त्यामुळे तेथे देशी दारू दुकानांची, बिअरबारची संख्या अधिक. साहजिकच तेथील स्त्रियांवर, कुटुंबावर दारुबंदीने होणारे विपरित परिणामही अधिक. स्त्रियांमध्ये असंतोषही अधिक; पण या असंतोष, उद्वेग प्रत्येक स्त्री आपल्यापुरतीच अनुभवत होती. दारूला, दारूच्या दुकानाला शिव्याही देत होती.

■

दारूमुळे अनेक संसार उद्ध्वस्त होत आहेत. आधीच दारिद्र्य, त्यात कुटुंबाची मिळकत दारूवर खर्च होते, त्यामुळे घरच्या गरजांची पूर्तता होत नाही, मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते, दारूच्या नशेत स्त्रियांना मारझोड केली जाते, शिवाय दारू पिणाऱ्यांच्या आरोग्यावर, मानसिकतेवर दारूचे विपरीत परिणाम होतातच. दारू प्यायल्यामुळे घरात सातत्याने भांडणे होतात, त्याचा मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होतो, परिसरात, समाजात कुटुंबाची प्रतिष्ठा मलीन होते. एवढे सगळे अनर्थ दारूमुळे होतात. यासाठी दारूबंदी व्हावी, अशी स्त्रियांची तळमळ असते.

प्रत्येकीला या नरकातून आपल्या नवऱ्याची, मुलाची सुटका व्हावी अशी इच्छा होती. वैयक्तिक पातळीवर केवळ शिव्याशाप देऊन काही उपयोग नव्हता. परंतु, आपण सर्व स्त्रिया एक झालो, संघटित प्रयत्न केले, तर आपली या नरकातून सुटका होईल, याची जाणीव त्यांना हळूहळू होऊ लागली. दारुविक्रीबंदीसाठी ग्रामसभेत एकूण मतदार स्त्रियांच्या पन्नास टक्के स्त्रियांनी पाठिंबा दिला. तर गावातील दारूची दुकाने बंद करावी लागतात, याची जाणीव त्यांना काही कार्यकर्त्यांनी, युवकांनी करून दिली. ही जाणीव सर्व स्त्रियांना दिलासा देणारी होती. युवकांचे, कार्यकर्त्यांचे पाठबळ त्यांना आश्वासक वाटू लागले आणि गावातील स्त्रिया हळूहळू संघटित होऊ लागल्या. दारुबंदी समिती स्थापन करण्यात आली. समितीच्या अध्यक्ष म्हणून सरपंच सौ० सुनीता शिंदे, तर कार्याध्यक्ष म्हणून सौ० स्वाती क्षीरसागर काम करू लागल्या. गिरीश फोंडे, पी० डी० पाटील, दिलीप शिंदे इत्यादी कार्यकर्तेही समितीच्या कार्यात सहभागी झाले. दारुबंदी समितीने गावात प्रबोधन सुरू केले. दारूचे दुष्परिणाम, दारूची दुकाने बंद होण्याची गरज आणि त्यासाठी स्त्रियांच्या ग्रामसभेतील सक्रिय सहभागाची गरज पटवून सांगणे, अशा पद्धतीने जवळपास तीन महिने प्रबोधन सुरू राहिले. अंतिमत: दारुविक्रीबंदीची मागणी समितीने ग्रामसभेत केली. त्यानुसार स्त्रियांची विषेश ग्रामसभा घेण्यात यावी, असा ठराव झाला.

दारुविक्रीबंदीचा होणारा ठराव स्त्रियांच्या विशेष ग्रामसभेत मांडला जाणार, याची बातमी वावटळीसारखी दारू दुकानांपर्यंत पोहोचली. दारू पिणाऱ्याच्यापर्यंत पोहोचली. त्यांना ही गोष्ट अडचणीची ठरणार होती; विशेषत: दारू दुकानदारांना स्त्रियांच्या विशेष ग्रामसभेत ठरावाला बहुमत मिळू नये, असेच वाटत होते. त्यासाठी त्यांनी विविध क्लृप्त्या वापरल्या. आपल्या बायकोचे/आईचे मतदार ओळखपत्र दारू दुकानात जमा करणाऱ्यांना मोफत दारू, त्यांना ग्रामसभेला जाऊ न देण्यासाठी मोफत दारू अशी आमिषे दारू पिणाऱ्यांना दाखवण्यात आली. काहीप्रमाणात ती यशस्वीही झाली.

वाठारमधील दारुविक्रीबंदीसाठी विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आली. सकाळी साडेअकरा वाजता ग्रामपंचायतीच्या पटांगणात खास उभारण्यात आलेल्या मंडपात सभा सुरू झाली. त्यावेळी मंडपाबाहेर असणाऱ्या स्त्रियांना मंडपात घ्यावे, असा आग्रह स्त्रियांनी केला. मतदानाची वेळ उलटून गेल्यामुळे बाहेरील स्त्रियांना मंडपात प्रवेश देता येणार नाही, असे गटविकास अधिकारी नितीन माने यांनी सांगितले. परंतु, बऱ्याच बाचाबाचीनंतर बाहेर उभ्या असलेल्या २१ स्त्रियांना प्रवेश देण्यात आला. दारुबंदी समितीच्या कार्याध्यक्षा सौ० स्वाती क्षीरसागर यांनी देशी दारुविक्री केंद्र, वाईन शॉप, बिअरबार यांचे

परवाने रद्द करून ही दुकाने बंद करावीत असा ठराव मांडला. त्यावेळी दारूमुळे स्त्रियांना कसा त्रास भोगावा लागतो याविषयी काही स्त्रियांनी आपले अनुभवकथन केले. विस्तार अधिकाऱ्यांनी कामकाज सुरू केले. ठरावावर हात उंचावून मतदान घेण्यात आले. सर्व स्त्रियांनी त्यास अनुमोदन दिले. ठराव खात्रीने मंजूर होणार म्हणून स्त्रियांनी जल्लोषही केला. गावातील सर्व मतदारांची संख्या २१३३ असल्यामुळे १०६८ स्त्रियांची उपस्थिती आवश्यक होती; परंतु प्रत्यक्ष सभेला १०५१ स्त्रिया उपस्थित असल्यामुळे हा ठराव शासकीय नियमांनुसार बारगळल्याचे सांगण्यात आले. १७ मतांनी ठराव बारगळल्यामुळे मंडपात निराशा पसरली. परंतु स्त्रिया नाउमेद झाल्या नाहीत. उपस्थित सर्व स्त्रियांनी पुन्हा अन्य ठिकाणी सभा घेतली. प्रशासनाचा निषेध नोंदवला आणि जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे पुन्हा एकदा विशेष महिला ग्रामसभा घेऊन गुप्त मतदान घेण्यासाठी निवेदन देण्याचे ठरवले. सर्व स्त्रियांनी दारुविक्रीबंदीचा लढा अधिक जोरकसपणे चालू ठेवण्याचा निर्णय घेतला.

ठरल्याप्रमाणे दारुविक्रीबंदीसाठी गुप्त मतदान घेतले जावे, असे निवेदन वाठारमधील स्त्रियांच्या सह्या घेऊन मा० जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांच्याकडे दिनांक ९ जुलै रोजी देण्यात आले. त्यानुसार १३ जुलैला जिल्हाधिकाऱ्यांनी प्रश्नाचे गांभीर्य व स्त्रियांची मानसिकता लक्षात घेऊन २३ जुलै रोजी वाठारमध्ये गुप्त मतदान घेतले जावे, असा आदेश दिला. या आदेशामुळे दारू दुकानमालक पुन्हा एकदा त्यास विरोध करण्यास सरसावले. पद्मराज परमीट रुमचे मालक अशोक ज्ञानदेव भोसले यांनी दारुविक्रीबंदी मतदानास स्थगिती मिळावी म्हणून न्यायालयात याचिका दाखल केली. याचिकेमध्ये भोसले यांनी अशी भूमिका घेतली की, 'आम्ही शासनाकडे योग्य ते शुल्क भरून परवाना घेतला आहे. शिवाय कायद्यानुसार दारुबंदीसाठी ग्रामसभेत एकदा ठराव मांडल्यानंतर तो ठराव मंजूर होवो अथवा न होवो, एक वर्षापर्यंत दुसरा ठराव मांडता येत नाही.' भोसले यांची भूमिका कायद्याच्या तांत्रिक बाबींचा विचार करता कदाचित योग्य असेलही; परंतु गावातील स्त्रियांच्या मानसिकतेचा विचार करता, हे लक्षात येते की, दारुबंदीच्या प्रश्नावर एवढ्या मोठ्याप्रमाणात स्त्रिया एकत्र आल्या म्हणजेच दारुविक्रीबंदी व्हावी, ही त्यांची अंतरिची तळमळ आहे. कारण, दारूमुळे अनेक संसार उद्ध्वस्त होत आहेत. आधीच दारिद्र्य, त्यात कुटुंबाची मिळकत दारूवर खर्च होते, त्यामुळे घरच्या गरजांची पूर्तता होत नाही, मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते, दारूच्या नशेत स्त्रियांना मारझोड केली जाते, शिवाय दारू पिणाऱ्यांच्या आरोग्यावर, मानसिकतेवर दारूचे विपरीत परिणाम होतातच. दारू प्यायल्यामुळे घरात सातत्याने भांडणे होतात, त्याचा मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होतो, परिसरात, समाजात कुटुंबाची प्रतिष्ठा मलीन होते. एवढे

---

आडव्या बाटलीसाठी १२८० मतदान झाले तर उभ्या बाटलीसाठी १०२ मतदान झाले. ९५ मते बाद झाली. परिणामी, दोन देशी दारूची दुकाने व पाच बिअरबार, म्हणजेच एकूण ७ दुकाने स्त्रियांच्या एकजुटीमुळे बंद झाली. दारुबंदी कृती समितीच्या अध्यक्षा, सरपंच सौ० सुनीता शिंदे यांनी यावेळी केलेले वक्तव्य अतिशय बोलके होते. त्या म्हणाल्या, ''महिलांच्या संघटित ताकदीचेच हे यश आहे. महिला काय करू शकतात, हे आज सिद्ध झाले.''

■

■

वाठारच्या यशानंतर दोनच दिवसांत किणी गावातील स्त्रियांनी दारुविक्रीबंदीसाठी आयोजित केलेल्या विशेष ग्रामसभेत मोठ्या संख्येने हजेरी लावली. किणी गावात असणारे देशी दारूचे दुकान बंद व्हावे, अशी त्यांची मागणी होती. दुपारी चार वाजता सभेचे अयोजन करण्यात आले होते; परंतु त्याच्या आधीपासूनच स्त्रियांनी गर्दी केली.
सरपंच सौ० सविता माने यांनी दारुबंदीचा ठराव मांडला. त्यास सौ० रंजना पाटील यांनी अनुमोदन दिले. स्त्रियांनी हात उंचावून ठरावाला पाठिंबा दिला आणि घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

------

सगळे अनर्थ दारूमुळे होतात. यासाठी दारूबंदी व्हावी, अशी स्त्रियांची तळमळ असते. या पार्श्वभूमीवर केवळ १७ स्त्रियांची मते कमी पडली म्हणून जर दारुबंदीचा ठराव तांत्रिकदृष्ट्या फेटाळला जात असेल, तर ते स्त्रियांवर अन्याय करण्यासारखे आहे, याची जाणीव होऊनच जिल्हाधिकाऱ्यांनी गुप्त मतदानाचा निर्णय घेतला आणि तो निश्चितच स्वागतार्ह आहे. याबद्दल स्त्रियांनी जिल्हाधिकाऱ्यांचे खचितच ऋणी राहिले पाहिजे. समाजाच्या मनाचा वेध घेऊन, कायद्याचा व्यापक अर्थ लावणाऱ्या अधिकाऱ्यांची आज भारतील समाजाला आत्यंतिक गरज आहे.

जिल्हाधिकाऱ्यांप्रमाणेच वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधिशांची भूमिकाही स्वागतार्ह आहे. परमिट रूमचे मालक भोसले यांनी जी न्यायालयात याचिका दाखल केली, त्यावर १८ जुलै रोजी शासनाच्या वतीने जी भूमिका मांडली गेली, त्याचा सहानुभूतीपूर्वक विचार मा० न्यायाधिशांनी केला. शासनाची भूमिका मांडताना तहसिलदार समीर शिंगटे यांनी असे सांगितले की, दारुबंदीसाठी ग्रामसभा व गुप्त मतदान या भिन्न गोष्टी आहेत. त्या निरनिराळ्या यंत्रणांमार्फत राबवल्या जातात. तसेच, शासनाच्या १२ फेब्रुवारी, २००९ च्या परिपत्रकात गुप्त मतदानाचा उल्लेख नसला तरी ते समाजोपयोगी असल्याने तीच पद्धत अवलंबली जावी. शासनाच्या भूमिकेबरोबरच न्यायालयाने वाठारच्या दारुबंदी कृती समितीच्या सदस्यांची व कार्यकर्त्यांची भूमिकाही समजावून घेतली. त्यांच्या मते २० मार्च, २००८ च्या परिपत्रकानुसार जिल्हा प्रशासनाकडून दारुबंदीसाठी विशेष ग्रामसभा घेऊन हात उंचावून मतदान घेतले जाते, परंतु या पद्धतीमुळे सकाळी केवळ तासाभरात सर्व स्त्रियांना एकत्र यावे लागते. एकाच वेळी सर्वांना येणे शक्यही होत नाही. शिवाय त्या वेळात स्त्रियांवर दबाव आणला जाऊ शकतो आणि त्याचा मतदानावर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच दारुबंदीचा निर्णय निवडणुकीप्रमाणे सकाळी ६ तासांच्या कालावधीत गुप्त मतदान घेऊन घेतला जावा. स्त्रियांनी न्यायालयाला दारुविक्री बंदीची गरजही पटवून सांगितली. डाव्या चळवळीतील कार्यकर्ते गिरीश फोंडे यांनी अशी भूमिका मांडली की, १२ फेब्रुवारी २००९ च्या परिपत्रकानुसार गुप्त मतदान पद्धतीनेच दारुबंदीसाठी मतदान घेतले पाहिजे. परंतु सध्या तहसिलदार जुन्या परिपत्रकानुसार हात उंचावून मतदान घेत आहेत. ही पद्धत बदलून गुप्त मतदान पद्धतीनेच मतदान घेतले जावे. न्यायालयापुढे मांडल्या गेलेल्या सर्व बाजूंचा विचार करून न्यायालयाने बिअरबार मालक भोसले यांची स्थगिती याचिका फेटाळली व ठरल्याप्रमाणे २३ जुलै रोजी मतदान घेण्याच्या प्रक्रियेला वाट मोकळी झाली.

मतदानाच्या पूर्वसंध्येला स्त्रियांनी घराघरांत जाऊन ठरावाच्या बाजूने म्हणजेच, आडव्या बाटलीवर शिक्का मारण्याचे आवाहन केले. दारुबंदी कृती समिती, तरुण मंडळे, बचत गट अशा अनेकांनी मतदानाबाबत जागृती

केली, बॅनर लावले. २३ जुलैला सकाळी आठ वाजता ग्रामपंचायत कर्यालयातील दोन केंद्रांवर पोलिस बंदोबस्तात मतदानाला सुरुवात झाली. पाऊस असूनही स्त्रिया मतदानासाठी घरातून बाहेर पडत होत्या. मतदान करताना दारुबंदीच्या घोषणा देत होत्या. स्त्रियांच्या मोठ्या रांगा त्यांच्या उत्साहाचे प्रतीक होत्या. दुपारी २ वाजता मतदानप्रक्रिया संपली आणि दुपारी चार वाजता मतमोजणीला प्रारंभ झाला. संध्याकाळी साडेपाचला निकाल जाहीर झाला. बाटली आडवी झाली आणि एकच जल्लोष सुरू झाला. गुलालाची उधळण करत स्त्रिया एकीच्या घोषणा देऊ लागल्या. आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्यांची विजयी भाषणे झाली. फटाक्यांची आतषबाजी झाली. स्त्री सामर्थ्याचा विजय झाला. एकूण २१६४ मतदारांपैकी १४४७ मतदान झाले. आडव्या बाटलीसाठी १२८० मतदान झाले तर उभ्या बाटलीसाठी १०२ मतदान झाले. ९५ मते बाद झाली. परिणामी, दोन देशी दारूची दुकाने व पाच बिअरबार, म्हणजेच एकूण ७ दुकाने स्त्रियांच्या एकजुटीमुळे बंद झाली. दारुबंदी कृती समितीच्या अध्यक्षा, सरपंच सौ० सुनीता शिंदे यांनी यावेळी केलेले वक्तव्य अतिशय बोलके होते. त्या म्हणाल्या, ''महिलांच्या संघटित ताकदीचेच हे यश आहे. महिला काय करू शकतात, हे आज सिद्ध झाले.''

भारतात गुप्त मतदानाद्वारे सात दुकानांमधून दारुविक्री बंद होणारी कदाचित पहिलीच घटना असेल. ३१ जुलै रोजी जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांना दिलेल्या आदेशानुसार या सातही दुकानांचे परवाने रद्दही करण्यात आले आहेत. ही बाब अत्यंत स्वागतार्ह आहे. वाठारच्या दारुविक्रीबंदी आंदोलनाचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे या आंदोलनाने परिसरातील इतर गावातील स्त्रियांनाही दारुविक्रीबंदीसाठी मोठ्याप्रमाणावर प्रेरणा दिली. शेजारीच असणाऱ्या किणी व भादोले या गावांतही दारुबंदीसाठी स्त्रिया संघटित होऊ लागल्या आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, मार्गदर्शन करण्यासाठी वाठारच्या दारू बंदला समितीच्या अध्यक्ष सौ० सुनीता शिंदे व सौ० स्वाती क्षीरसागर व इतर कार्यकर्ते या गावात जात आहेत.

वाठारच्या यशानंतर दोनच दिवसांत म्हणजे २५ जुलैला किणी गावातील स्त्रियांनी दारुविक्रीबंदीसाठी आयोजित केलेल्या विशेष ग्रामसभेत मोठ्या संख्येने हजेरी लावली. किणी गावात असणारे देशी दारूचे दुकान बंद व्हावे, अशी त्यांची मागणी होती. दुपारी चार वाजता सभेचे अयोजन करण्यात आले होते; परंतु त्याच्या आधीपासूनच स्त्रियांनी गर्दी केली. सरपंच सौ० सविता माने यांनी दारुबंदीचा ठराव मांडला. त्यास सौ० रंजना पाटील यांनी अनुमोदन दिले. स्त्रियांनी हात उंचावून ठरावाला पाठिंबा दिला आणि घोषणांनी परिसर दणाणून सोडला. दारुविक्रीबंदीसाठी गुप्त मतदान घेतले जावे यासाठी स्त्रियांच्या सह्यांचा मागणी अर्ज, जिल्हाधिकाऱ्यांना देण्यासाठी तयार करण्यात आला. ९४५ स्त्रियांनी मागणी अर्जावर सह्या केल्या आणि २७ जुलैला तो अर्ज जिल्हाध्यक्षांकडे सुपूर्द करण्यात आला.

असेच काहीसे भादोले गावातही झाले. या गावात एक परमिट रूम व ग्रामपंचायतीसमोरच देशी दारूचे दुकान आहे. १२ जुलैला तेथील स्त्रियांनी दारुबंदी यशस्वी करण्याच्या निर्धाराने बिरदेव मंदिरात स्त्रियांची बैठक घेतली. त्यात दारुबंदी कृती समिती स्थापन करण्यात आली आणि स्त्रियांची विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात करावी असेही ठरले. स्त्रियांच्या संघटित प्रयत्नांना यश येईल या खात्रीने सर्व स्त्रिया कामाला लागल्या. वाठारमधील दारुबंदीच्या यशानंतर त्यांचा उत्साह द्विगुणित झाला. २८ जुलै रोजी स्त्रियांची विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. जवळवास १३६० स्त्रियांनी सभेस उपस्थिती लावली. दारुविक्रीबंदीच्या ठरावावर गुप्त मतदान घेण्यासाठी स्त्रियांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्याचे ठरले आणि दारुविक्रीबंदीची मोहीम यशस्वी करण्याचा निर्धार सर्व स्त्रियांनी केला.

किणी आणि भादोले या दोन्ही गावांतील स्त्रियांचा उत्साह पाहता या दोन्ही गावांत दारुविक्रीबंदीच्या ठरावाला

गुप्त मतदानाद्वारे पाठिंबा मिळणार, हे स्पष्टच झाले आहे. या तीन गावांचे अनुकरण करत आणखीही काही गावांतील स्त्रिया खात्रीने पुढे येतील. ३१ जुलै २००९ रोजी त्यांचीच प्रेरणा घेऊन इचलकरंजीच्या स्त्रियांनी गावठी दारू अड्ड्यांवर हल्ला केला आणि आपला दारूविषयीचा राग व्यक्त केला. या सर्व आंदोलकांनी स्त्री सामर्थ्याचे अनोखे दर्शन घडवले. स्त्रियांचा उत्साह, त्यांचे संघटन वाखाणण्यासारखी होते; परंतु तरीही काही प्रश्न अनुत्तरित राहतात.

काही अनुत्तरित प्रश्न :

१. दारुविक्रीबंदीसाठी यापूर्वीही आंदोलने झाली; परंतु कालांतराने त्या गावामध्ये पुन्हा दारू दुकाने सुरू झाली. दारू दुकानांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले नाहीत किंवा रद्द केले गेले तरी ते पुन्हा मिळवले गेले. त्यामुळे या आंदोलनांमधून मिळणारे यश कायमस्वरूपी टिकावे यासाठी कशारीतीने प्रयत्न केले पाहिजेत, याचा विचार नागरी समाजाने केला पाहिजे.

२. दारुविक्रीबंदीच्या निमित्ताने संघटित झालेल्या स्त्री-सामर्थ्याचा वापर करून, त्यांना इतर प्रश्नांवर जसे रोजगार, पाणी, आरोग्य संघटित कसे करता येईल व त्यांच्यातील ऊर्जा व कार्यप्रवणता कशी टिकवता येईल यासाठी कसे प्रयत्न करावेत, याचाही विचार केला गेला पाहिजे.

३. दारुविक्रीबंदीसाठी स्त्रियांची विशेष ग्रामसभा घेणे व बहुमताचा पाठिंबा मिळाला तर दारू दुकाने बंद करणे, असा नियम आहे व तो अतिशय चांगलाही आहे. परंतु दारूचे विपरित परिणाम केवळ ग्रामीण भागातील स्त्रियांवरच होतात, शहरी भागातील स्त्रियांवर होत नाहीत, असे समजण्याचे कारण नाही. कनिष्ठ व कनिष्ठ मध्यमवर्गीय समाजाचे वास्तव्य ज्या शहरी परिसरात आहे तेथेही स्त्रियांचे जीवन दारूमुळे होरपळून निघत आहे; परंतु ग्रामसभेसाठी संरचना शहरी भागात नाही. आज महाराष्ट्रात शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढला आहे. पण, शहरी भागातील लोकांचा लोकप्रतिनिधींवर अंकुश राहील, अशी ग्रामसभेसारखी कोणतीही संरचना शहरांमध्ये नाही. वास्तविकत: वॉर्ड सभा निर्माण करून तिला ग्रामसभेसारखे (दारुविक्रीबंदीसह) अधिकार देण्याची नितांत गरज आहे. त्यायोगे शहरात होणाऱ्या अपुऱ्या नागरी सुविधांच्या प्रश्नालाही हात घालता येईल व भ्रष्टाचारावरही अंकुश ठेवता येईल.

४. दारुविक्रीतून मिळणाऱ्या महसूल/उत्पादन शुल्क, राज्यांच्या आर्थिक स्रोतांचा एक भाग आहे. त्यामुळे दारुबंदीसारखे निर्णय राज्यांकडून घेतले जात नाहीत. काही राज्यांनी तसे प्रयत्न केले; पण ते अयशस्वी झाले. वास्तविकत: भारतीय लोकशाहीच्या निम्म्या भागीदार स्त्रिया आहेत आणि दारूमुळे स्त्रियांचे जीवन होरपळून निघत आहे, हे आपणा सर्वांना माहीत आहे. तरीही त्यांच्यावर अन्याय करणाऱ्या दारूवर बंदी आणण्याचा विचार शासन करीत नाही. स्त्रियांबाबत डोळे असून ते डोळेझाक करत आहे. यापूर्वीही एकदा त्याचा प्रत्यय आलाच आहे. महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'महिला धोरणात' दारुविक्रीतून मिळणाऱ्या कराचा वापर स्त्रियांच्या विकासासाठी केला जाईल असे विसंगत आश्वासन या धोरणात दिले गेले होते. तो स्त्रीवादी नव्हे; पण समतावादी चष्म्यातून जोपर्यंत राज्यकर्ते या प्रश्नाकडे बघत नाहीत, तो पर्यंत या प्रश्नाच्या मुळाशी जाणे शक्य होणार नाही, तोपर्यंत स्त्रियांचा लढा चालूच राहील, तो राहावा आणि अधिक तीव्र व्हावा अशीच इच्छा आहे.

■

राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ
कोल्हापूर

('प्रबोधन प्रकाशन ज्योती'मधून साभार)

लेख

# तिची अस्मिता खुडू नका

शैला बोराडे

भारतीय संस्कृतीने महिलांना सुशीलतेच्या मखरात बसवून तिला देवीचे स्थान दिले. पण वास्तव जगात मात्र मानाचे स्थान देण्याची वेळ आली की, पुरुषप्रधान संस्कृती डोकं वर काढते. त्यामुळे देवीसमान मानलेल्या स्त्रीला खऱ्या अर्थाने कधीही सन्मान मिळू शकला नव्हता. राजकारण हा तर एके काळी स्त्रियांच्या दृष्टीने कोसोमैल दूरचा प्रांत होता. राजकारण आणि स्त्रिया ही गोष्टच मान्य केली जात नव्हती. त्यामुळे या क्षेत्रात पुरुषांची मक्तेदारी राहिली. आता परिस्थिती पूर्ण बदललेली आहे. ५० टक्के आरक्षणाबरोबर शिक्षणाच्या प्रसारामुळे राजकारणात महिलांचा वावर वाढला आहे. किंबहुना काही ठिकाणी महिलांनी स्वत:चे स्थान निर्माण केलेले आहे. राजकारणातील ही स्त्री-शक्ती आता राजकारणाला नवी दिशा देऊ लागली आहे.

पुराणातदेखील स्त्रीला विशेष महत्त्व दिले आहे. रामायणातील सीता व महाभारतातील कुंती, द्रौपदी या स्त्रियांबद्दल आपणाला माहिती आहेच. आपल्या संपूर्ण आयुष्यात पतीच्या बरोबरीने अनेक समस्यांना तोंड देत या स्त्रिया हिमतीने जगल्या आहेत. त्यातून त्यांच्या अंगी असणाऱ्या क्षमता, सामर्थ्य, आदर्श व्यक्तिमत्त्व यांचे दर्शन घडते. राजमाता जिजाऊ देखील तेवढेच प्रेरणादायी

■

मला माझ्या घरातून संपूर्ण पाठिंबा मिळाला होता. त्यामुळे मला माझी योग्यता सिद्ध करता आली. म्हणूनच मी अनेक निर्णय, अनेक योजना राबवू शकले. सुदैवाने माझ्या कामात घरातील लोकांनी हस्तक्षेप केला नाही. असाच सर्व स्त्रियांना पाठिंबा मिळतो असे नाही. माझ्याबरोबर ज्या स्त्रिया सरपंच झाल्या, त्या नावापुरत्या अनेक वेळा केवळ सरपंच म्हणून राहिल्या. कारण त्यांचा सर्व कारभार व व्यवहार त्यांचे पतीच करत असत.

-----

असे व्यक्तिमत्त्व आहे. शहाजी राजांच्या गैरहजेरीत सर्व राज्याचा कारभार त्यांनी अतिशय कर्तबगारीने सांभाळला आहे. तसेच मुघलांकडून होणारे अत्याचार थांबवण्यासाठी त्या मनामध्ये संकल्प बांधत होत्या. अशातच शिवरायांचा जन्म झाला. शिवरायांना स्वराज्याचे बाळकडू त्यांनी दिले. या आणि अशा अनेक शूर, कर्तृत्ववान स्त्रियांचे योगदान आपल्या देशास, महाराष्ट्रास लाभले आहे. झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर, इंदिरा गांधी, सावित्रीबाई फुले अशी अनेक नावे घेता येतील.

महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना शिक्षणाची दारे उघडून दिली. राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथा बंद केली. या व अशा अनेक सुधारकांनी महिलांचे शिक्षण, महिला सक्षमीकरण, महिलांचे हक्क यांच्यासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी केली. पण हा झाला इतिहास. आता थोडा आपण वर्तमानकाळाचा विचार करू या.

मा० शरद पवारसाहेब मुख्यमंत्री झाले व आपल्याला प्रथमच ३३ टक्के आरक्षणाचा लाभ मिळाला. आता स्थानिक स्वराज्य संस्थेत स्त्रियांना ५० टक्के आरक्षण मिळाले आहे. ते असायलाच हवे.

आपली संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. राजकीय क्षेत्रांमध्ये आपण पाहतो की, पुरुषांची मक्तेदारी आहे. या वर्षीसुद्धा संसदेमध्ये महिला आरक्षण विधेयक मंजूर झाले नाही, तरीही स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ५० टक्के आरक्षण मिळाले आहे. आपण त्याचा पुरेपूर फायदा करून घेतला पाहिजे.

राजकारण आणि स्त्रिया असे म्हटले की, पुरुषांच्या भुवया उंचावतात. ते लगेच त्या स्त्रीकडे संशयाच्या नजरेने पाहतात. ते कळत नकळत तिच्या चारित्र्याची परीक्षा घेत असतात. हे सर्व पुरुषांमुळेच होते. यामुळे स्त्रियांचा राजकारणातील सहभाग कमी प्रमाणात दिसून येतो. तसेच राजकारणात स्त्रियांना तिच्या घरातील वागणूक किंवा कौटुंबिक दबावामुळे स्वत:च्या अंगी असणाऱ्या गुणांना वाव मिळत नाही. फक्त घरच्यांच्या सांगण्याप्रमाणे वागावे लागते. मी जेव्हा सरपंच झाले तेव्हा ३३ टक्के आरक्षण होते. माझ्याबरोबर अनेक स्त्रिया सरपंच झाल्या. मला माझ्या घरातून संपूर्ण पाठिंबा मिळाला होता. त्यामुळे मला माझी योग्यता सिद्ध करता आली. म्हणूनच मी अनेक निर्णय, अनेक योजना राबवू शकले. सुदैवाने माझ्या कामात घरातील लोकांनी हस्तक्षेप केला नाही. असाच सर्व स्त्रियांना पाठिंबा मिळतो असे नाही. माझ्याबरोबर ज्या स्त्रिया सरपंच झाल्या, त्या नावापुरत्या अनेक वेळा केवळ सरपंच म्हणून राहिल्या. कारण त्यांचा सर्व कारभार व व्यवहार त्यांचे पतीच करत असत.

आता काळाप्रमाणे स्त्रियांनीसुद्धा बदलले पाहिजे. राजकारणात स्त्रियांचा वापर टाळला पाहिजे. आपले हक्क आणि अधिकार यांचा योग्य वापर केला पाहिजे. ५० टक्के आरक्षणाचा योग्य फायदा स्त्रियांनी करून घेतला पाहिजे. आपल्या अंगी असणाऱ्या गुणांनी आपण क्रांती घडवू शकतो. त्यासाठी राजकारण हे उत्तम साधन आहे. ही झाली एक बाजू आता दुसरी बाजू पाहू या.

सध्या महाराष्ट्रात अनेक लहान-मोठे राजकीय पक्ष

आज मोठमोठ्या पदांवर असणाऱ्या स्त्रियांनासुद्धा त्यांच्या वरिष्ठांच्या सांगण्याप्रमाणे कामकाज पाहावे लागते. स्वत:चे मत बाजूला ठेऊन पक्षाचे ऐकावे लागते. पण याला विरोध केला की, त्यांची हकालपट्टी करणे, बदनामी करणे असे प्रकार घडतात. कारण या राजकारणात स्त्रिया फक्त त्यांच्या तालावर नाचणाऱ्या कठपुतळ्या असतात. यात महिलांचा मोठ्याप्रमाणात बळी जातो.

आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेत जरी ५० टक्के आरक्षण असले तरी प्रमुख राजकीय पक्षांमध्ये महिला आरक्षण हा प्रश्नच उद्‌भवत नाही. आपण राजकीय पक्षांच्या अनेक सभा पाहतो. त्या व्यासपीठांवर किती स्त्रिया बसलेल्या असतात, तर अगदी बोटावर मोजण्याइतक्या. मोठ्या सभांमध्ये शिवसेनेच्या नीलम गोरे वगळल्या तर कुठलीच महिला व्यासपीठावर दिसत नाही. टीव्हीवरील चर्चासत्रांत नीलम गोऱ्हे व राष्ट्रवादीच्या विद्या चव्हाण यांच्याशिवाय दुसऱ्या कुठल्याच राजकीय पक्षाच्या महिला आपण पाहत नाही. अशाप्रकारची प्रचंड उदासीनता आपण राजकीय पक्षांमध्ये महिलांविषयी पाहतो. मग या ५० टक्के आरक्षणाचा उपयोग काय?

निवडणुका आल्या की महिलांचा खूप मोठ्या प्रमाणात वापर होताना दिसतो. गर्दी जमवायची असल्यास महिलांचा समूह मोठ्या प्रमाणात पाहतो?

मागच्याच महिन्यात मुंबईच्या महापौर शुभा राऊळ आणि नगरसेविका मनिषा म्हात्रे यांच्याशी त्यांच्याच पक्षाच्या अधिकाऱ्यांनी अरेरावीची भाषा केली व त्यांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले. प्रत्येक वेळी कर्तृत्ववान स्त्रियांना प्रत्येक राजकीय पक्षाने दाबण्याच्या घटना आपण पाहतो. फक्त समाजात व भाषणात त्यांचा उदोउदो होतो. अशाप्रकारे मतांच्या राजकारणासाठी त्यांचा वापर करून घेतला जातो. आज मोठमोठ्या पदांवर असणाऱ्या स्त्रियांनासुद्धा त्यांच्या वरिष्ठांच्या सांगण्याप्रमाणे कामकाज पाहावे लागते. स्वत:चे मत बाजूला ठेऊन पक्षाचे ऐकावे लागते. पण याला विरोध केला की, त्यांची हकालपट्टी करणे, बदनामी करणे असे प्रकार घडतात. कारण या राजकारणात स्त्रिया फक्त त्यांच्या तालावर नाचणाऱ्या कठपुतळ्या असतात. यात महिलांचा मोठ्या प्रमाणात बळी जातो.

आज मी एक महिला पदाधिकारी म्हणून काम करते. मला अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. माझी वृत्ती वाईटातून चांगलं शोधण्याची असल्यामुळे मी अजून टिकून आहे. मला माहीत आहे की, माझा पण वापर होऊ शकतो. पण असंही होऊ शकतं की, माझ्या संकल्पना व महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी सत्तेचा व पक्षाचा योग्य तो प्रामाणिक वापर करून घेते. आज ज्या महिला अध्यक्षा, सरपंच, सभापती असतील, त्यांना मोकळेपणाने काम करण्याची मुभा नाही. त्यामुळे त्या आपल्या स्वत:चा वेगळा ठसा उमटवू शकत नाही.

या सर्व गोष्टी स्त्रियांवरील अत्याचार, त्यांचे हक्क, सन्मान यांची पायमल्ली पूर्वीपासून चालत आलेली आहे. पण आता वेळ आली आहे हे सर्व थांबवण्याची, त्यासाठी आपण आपल्यातील स्त्री-शक्ती जागे करण्याची.

*समान मानव माना स्त्रीला तिची*
*अस्मिता खुडू नका*
*दासी म्हणूनी पिटू नका वा देवी*
*म्हणूनी भजू नका*

कवी कुसुमाग्रजांनी स्वातंत्र्य 'देवतेची विनवणी' या कवितेतून केलेल्या आव्हानाचे प्रत्यंतर आता आले पाहिजे. स्त्री-पुरुष समानतेचे वारे आता वाहू लागले पाहिजे.

■

सगुणा

लेख

# आता लढायचं कुणाशी ?

शरिफा बाले

मैत्रिणींनो, नुकताच प्रदर्शित होऊन गेलेला 'देऊळ' चित्रपट तुम्ही पाहिलाच असेल. वरवर पाहता हा चित्रपट आपल्या मनातलं देवाचं स्थान, भोळी श्रद्धा, आणि याचा फायदा घेत असलेल्या व नकळतच आपल्या भावनांचा बाजार मांडणाऱ्या राजकारणी व्यवस्थेचं चित्रिकरण सादर करताना दिसतो. पण जर यातून आपण स्त्री पात्रांचा विचार केला तर आधुनिक भारतातील स्त्री-सत्ताकारणाचे व्यंगचित्र दिसते. ते कसे ते आपण बघू या.

चित्रपटातील सरपंच बाई आणि तिची सासू यांची खूप गंमत वाटते. या दोन्ही पात्रांची भूमिका मला जवळची वाटते. सरपंच बाईच्या सासूची भूमिका ही तशी नवीन नाही. आजूबाजूला आपण अशा कितीतरी बायका बघत असतो. ज्या सूनेला किंवा मुलीला सारखं कुठल्या ना कुठल्या गोष्टी वरून टोकत असतात. स्वत:चं वर्चस्व कायम टिकवण्यासाठी छोट्या छोट्या गोष्टींवर लक्ष ठेवून असतात. अनुभवांची समृद्धी, वयामुळे मिळालेलं उच्च स्थान यामुळे आपोआपच घरातली सूत्रे त्यांच्या हातात येतात. सूत्रे आल्यानंतर अतिशय हुशारीने ती निभावलीही जातात. त्यासाठी त्यांना कुठल्याही कोर्सेसची गरज नसते. म्हणजे नेतृत्व कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, आत्म-विश्वास वाढवणे, आदर्श सून, आदर्श आई कसे बनता येईल वगैरे अशा कोर्सेसची त्यांना गरज भासत नाही. त्यांच्यात आत्मविश्वास ठासून भरलेला असतो. मग ते शेतात भाकरी घेऊन एकटीने जाणे असू दे किंवा बकरी घेऊन चरायला जाणे असू दे अथवा एकटीच्या खांद्यावर संसाराची जबाबदारी पेलणे असू दे. हातात घेतलेलं प्रत्येक काम यशस्वी पार पाडून त्यातून मिळालेल्या अनुभवाची साठवण करून पुढच्या पिढीला ही शिदोरी वाटत असतात. ही परंपरा सासू-सून, आई-मुलगी अशी चालत असते. त्यात जर सून किंवा मुलगी भांबावलेली किंवा गोंधळलेली दिसली तर तिला येता-जाता, बसता-उठता टोचून बोलून गुलामगिरी म्हणजे काय हे शिकवलं जातं. या गुलामगिरीतून मुक्तता हवी असेल तर आवाज चढलाच पाहिजे, अशी शिकवणीच दिवस-रात्र चालू असते.

आमच्या घरी एकदा माझ्या आईची चुलती- आजी आली होती. शेतात काम करणारी, नऊवारी नेसणारी. पुण्यात भाचीचा संसार कसा सुरू आहे, हे बघायला आली. तेव्हा आम्हाला तिच्याशी कसं बोलावं, हेच कळेना. कारण आम्ही फ्लॅटमध्ये राहणारे म्हणजे तिच्या हिशोबाने काडीपेटीच्या डब्ब्यात राहणारे. शहरामध्ये सगळे हळुवारच बोलतात, पण आजीचा आवाज इतका मोठा होता की दुसऱ्या मजल्यावरच्या घरात ही काय बोलतेय, हे तिथला माणूससुद्धा सांगू शकेल. एवढ्या खणखणीत आवाजात ती आमच्याशी गप्पा मारत होती. तिचे शेतावरचे अनुभव, मैत्रिणींचे गंमतीदार किस्से रंगवून सांगत होती. ती गेल्यानंतर आम्हाला इतरांनी आवर्जून विचारलं. अहो, सगळ ठीक आहे ना? भांडण संपलं का? हे ऐकून आम्हाला प्रत्येकाला सांगावं लागलं की हे भांडण नव्हतं. प्रेम होतं. आमची आजी शेतात काम करणारी बाई आहे. मोठमोठ्याने हाळी देऊन ती बैल हाकत असते. तीन एकर शेतामध्ये उभी असली तरी रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्या प्रत्येकाची मोठ्या आवाजात विचारपूस करत असते. गावात गेल्यावर तर प्रश्नच नसतो. सगळ्याच बायकांचे आवाज मोठे असतात. याचा अर्थ ते भांडतातच असं नाही, पण ते जे काम करतात त्यातून त्यांच्यामध्ये आलेला हा आत्मविश्वास असतो. भौतिक परिस्थितीही तशीच असते. आजीने तिच्या मैत्रिणीला आवाज दिला तर नुसत्या आवाजावरून आख्ख्या गल्लीला कळतं की जैतून-खाला आली आहे. मग तिच्या मैत्रिणीही आपलं हातातलं काम करत करत तिच्याशी गप्पा मारणार. या गप्पा फक्त जैतून-खालाशीच नाही तर एकमेकींशी पण होत असत. दणदणीत आवाजामुळं कोण काय बोलतं आहे, हे प्रत्येकीला घरात बसून कळतं. आताच्यासारखी मिसकॉलची भाषा नाही, जे आपण मुली करत असतो. एवढ्या वाजता मिसकॉल आला की घरातून निघायचं, हे ठरवून आपण तयारी करत असतो!

या चित्रपटातलं अजून एक पात्र जे सरपंच बाईचं आहे. कागदोपत्री ती सरपंच बाई आहे. पण प्रत्यक्षात 'भाऊं म्हणजे गावातील माजी सरपंच, राजकारणी पुरुष. पुढे आमदार, खासदार होण्याची स्वप्ने पाहणारा हा माणूस. खरंतर आरक्षणामुळे या गावात महिला सरपंच झाली. नाही तर 'भाऊंची' परंपरा कायम राहणार होती. पण वास्तविक महिला सरपंच आली तरी भाऊंचीच परंपरा चालू आहे. म्हणजे या सरपंचबाई कुठलंही काम भाऊंना विचारल्याशिवाय करू शकणार नाही, अशी परिस्थिती भाऊंनी निर्माण करून ठेवली आहे. अगदी हातात पेन घेणं असू दे किंवा कोणाला सांत्वन देणं असू दे, गावात फिरणं, काम करून घेणं, आपल्या राजकीय पक्षाला रिपोर्टिंग करणं हे सगळं भाऊच बघतात. फक्त प्रतीक म्हणून दाखवायचं असेल की या गावात सरपंच 'बाई' आहे, तेव्हाच त्यांना घरातून बोलवलं जातं. नाही तर कार्यालय आणि कार्यालयातील सर्व निर्णय यांच्याशी तिचा काहीही संबंध ठेवला जात नाही. त्यावर भाऊंची एकाधिकारशाही असते. या प्रसंगामुळे चित्रपटात विनोद निर्माण होतोच. पण त्याचबरोबर महिला सत्ताकारणाची व्यंग परिस्थितीही समोर येते. राजकारण्यांच्या राजकीय पोळ्या भाजण्यासाठी महिला आरक्षण देऊन महिला सरपंच बनल्या. तसेच पुरुषप्रधान संस्कृती असलेल्या राजकीय परंपरेने त्यांचे हे स्वातंत्र्य फक्त नावापुरतेच ठेवले. दुसरीकडे आपल्या घरात आपली आजी, पणजी यांनी घर, शेत सांभाळले. कुठली पिकं घ्यायची जमिनीच्या वाटण्या कशा करायच्या इथपासून ते कोणाला कोणती मुलगी करायची, नातवंडाची नावं काय ठेवायची, अगदी आज काय स्वयंपाक करायचा इथपर्यंत त्यांचीच एकाधिकारशाही दिसते. जमीन, घर जरी तिच्या नावावर नसले (कागदोपत्री) तरी अनौपचारिकपणे तिचीच सत्ता होती. मग प्रश्न उरतो सत्तेचा. खरंच भारतात महिलांना सत्तेत स्थान मिळणार आहे का? याचं उत्तर हेच सापडतं की महिलांना औपचारिकपणे सत्तेत सामावून घेतलं जातं, पण अनौपचारिकपणे पुरुषप्रधान संस्कृती राबवली जाते. सरपंच असूनसुद्धा 'भाऊंच्या' मागे फिरावं लागतं.

अशी आजची परिस्थिती आहे. पण हे सर्व चित्र असंच काळं-पांढरं असतं असं नाही. स्त्रियांचे लढे, कायदे-कानून, शिक्षणाचे वाढते प्रमाण या सर्वांमुळे आजच्या सत्तार्जनाच्या परिस्थितीत स्त्रियांचे समायोजन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ते कशाप्रकारे होते याची भूमिका भाऊंच्या बायकोने केलेली भूमिका आहे.

भाऊंची बायको ही थोडीफार शिकलेली, गावात नवऱ्याच्या पदाचा रुबाब दाखवणारी स्त्री. सेक्रेटरी असल्यासारखी ती आपल्या पतीला त्याच्या प्रत्येक कामात मदत करते. त्याला निर्णय घेण्यात मदत करते. भाऊंना दोन अपत्य- मुली आहेत. गावातल्या सरपंच बाईला कुठलेही अधिकार न देणारा व आपले वर्चस्व गाजवणारा हा पुरुष त्याच्या कुटुंबामुळे लगेच पुरोगामी ठरतो. त्याची वर्चस्ववृत्ती बाजूला गळून पडते. त्याला हवे तेव्हा तो ही आयडेंटीटी वापरून परिस्थितीचा फायदा उचलतो. त्यामुळे या कुटुंबाचे चित्र हे आभासी चित्र वाटते. साक्षर झालेल्या स्त्रियांना ही स्त्री-मुक्ती म्हणजे अमुक जागी घर, इलेक्ट्रॉनिक वस्तूंची भरमार, सुख-सोयीयुक्त घरे अशी स्वप्नं दाखवली जातात. अशा स्त्रिया घरच्या बटाटेवड्याऐवजी बर्गरला पसंती देतात.

यात शिकलेली स्त्री प्रत्यक्षपणे पुरुषप्रधान संस्कृतीच चालवताना दिसते. नवऱ्याच्या कामात आपल्या साक्षरतेचा उपयोग करून त्याच्या हिशोबाचा लेखाजोखा ठेवते. नकळतपणे त्याच्या वर्चस्व गाजवण्याच्या पुरुषीवृत्तीला हातभार लावते. किंबहुना त्याच्या बरोबर तीही वर्चस्व गाजवू लागते. यातून स्त्री-सत्तेचे आणि सबलीकरणाचे माकडच होताना दिसते. कारण प्रतीक म्हणून स्त्रीला वापरले जाते आणि तिच्याकडूनच पुरुषप्रधान व भांडवली संस्कृती राबवली जाते. त्यामुळे आता सत्ता कोणापासून मागायची, कोणाशी लढायचं हाच प्रश्न निर्माण होतो.

'देऊळ'मध्ये खरंतर आजच्या राजकीय परिस्थितीचे चित्रण झालेले दिसते, ज्यात सत्तेचे औपचारिक सत्ता, अनौपचारिक सत्ता आणि समायोजन सत्ता हे तिन्ही प्रकार आपल्याला दिसतात. खरंतर या समायोजन सत्तेपासूनच सध्या बरेच धोके उद्‌भवले आहेत. आजच्या राजकीयस्थितीमध्ये पुढारी भ्रष्टाचार, दूराचार, वर्चस्ववादी पक्षांचे नेतृत्व आपल्या मुलींकडे, पत्नीकडे देताना दिसतात. त्याही हे नेतृत्व घेऊन भांडवलशाही आणि पुरुषप्रधान संस्कृतीला जे हवं तेच करतात. यात गोंधळ उडतो तो सामान्य स्त्रियांचा, ज्यांना आता लढायचं कुणाशी हेच लवकर कळू दिलं जात नाही.

सत्तेच्या या खेळात शेवटी प्रश्न असा निर्माण होतो की राजकारण, पक्ष व लोकशाही या परंपरा सुरू होऊन कित्येक वर्षे उलटली. आता कुठे स्त्रियांना राजकीय आरक्षण देऊन सत्तेत सामावून घेतलं जात आहे. याला स्त्रियांचा समतेच्या लढ्यातला विजय म्हणायचा की पुरुषप्रधान सत्तेचा नवीन सापळा? पुरुषीसत्तेचा सापळा यासाठी की या सर्वांना माहीत आहे की आर्थिक आणीबाणी येऊन ठेपलेली आहे, तरुणांसमोर नोकऱ्यांचे प्रश्न आहेत, आर्थिक अडचणींमुळे प्रचंड राजकीय खळबळ उडणार आहे, अशा स्थितीत स्त्रियांना बहुसंख्येनं सत्तेत आणलं जातं. गंमत म्हणजे त्यांना कुठलेच अधिकार प्रत्यक्षात राबवू दिले जात नाहीत. याचा अर्थ पुरुषीसत्ता आपल्या राजकीय असंतोषाचं खापर फोडण्याचं माध्यम म्हणून तर स्त्रियांना वापरून घेत नाही ना?

येणाऱ्या शंभर वर्षांनी भावी पिढी या राजकीय स्थितीचा अभ्यास करेल तेव्हा ती हाच निष्कर्ष काढेल. आज फ्रेंच राज्यक्रांतीबद्दल शिकवले जाते की चौदाव्या लुईच्या राणीला लोकांनी विचारलं 'आम्हाला खायला ब्रेड द्या', राणीने म्हणे असं उत्तर दिलं की 'ब्रेड नाहीय तर केक खा.' मग क्रांती सुरू झाली. त्या एका राणीमागे आर्थिकविषमता निर्माण करणारे भांडवलदार, शासनकर्ते लपलेले आहेत. आज इतक्या वर्षांनी आपणही हेच खरे माणून चालतो की राणीच वाईट होती, खरे आहे ना?

■

संपर्क : ९८५०१९५२७६
पिंपळे-गुरव, पुणे २७

**सगुणा विशेष**

# मन हेलावून टाकणारे फुकुशिमाचे दु:ख

---

सत्यजित चव्हाण

■

११ मार्च २०१४ रोजी जपानमधील फुकुशिमा येथील अणुभट्टीत झालेल्या स्फोटाच्या दुर्घटनेला तीन वर्षे पूर्ण होत आहेत. काय आहे येथील होरपळलेल्या नागरिकांची स्थिती, अणुऊर्जेने, किरणोत्सर्गाने तिथल्या जल-जंगल-जमीन यांची कशी वाट लावली, याचे भेदक विवेचन करणारा **सत्यजित चव्हाण** यांचा हा संपादित लेख आम्ही 'सगुणा'च्या वाचकांसाठी मुद्दाम पुनर्मुद्रित करत आहोत.

११ मार्च २०११ जपानमध्ये भूकंप आला. त्सुनामीही आली होती. हजारो (अदमासे १८,५००) लोकांचे प्राण गेले. ही नैसर्गिक आपत्ती होती, पण दुसरी आपत्ती ही मानवनिर्मित होती. जपानच्या पूर्व किनाऱ्याजवळील फुकुशिमा प्रांतातील दाईची कंपनीच्या अणुप्रकल्पातील चार भट्ट्या अपघातग्रस्त झाल्या. किरणोत्सार परिसरात पसरला. तत्काळ प्रकल्पापासून २० किमी त्रिज्येचा भाग खाली करण्यात आला. धोकादायक पातळीच्या कित्येक पटीने किरणोत्साराची पातळी जास्त होती. परंतु त्या वेळी वाहणाऱ्या वाऱ्याच्या दिशेने किरणोत्सारीद्रव्ये अनेक किमी लांबवरच्या परिसरात पसरली होती. किरणोत्साराची मात्रा हजारोपटीने वाढली. काहींना विस्थापित होण्यास सांगण्यात आले, काही स्वत:हून विस्थापित झाले. जमीन-जल-वनस्पती सर्वच बाधित झाले होते. जपानची जनता दु:खात होती. पण...

जपानच्या अणुव्यापार कंपन्यांना हा अपघात लपवायचा होता. का? तर जपान अणुतंत्रज्ञान निर्यात करण्यात अग्रभागी आहे. हा व्यापार त्यांना वाढवायचा होता. जपानमधीलही बरेच अणुप्रकल्प पुन्हा सुरू करायचे होते. या पार्श्वभूमीवर फुकुशिमा दुर्घटनेचे दुष्परिणाम सर्व जगाने बघणे त्यांच्यासाठी त्रासदायक होते. मग सुरू झाला बातम्या दाबण्याचा प्रकार. विस्थापितांना वाऱ्यावर सोडण्यात आले. कोरणोत्साराची मात्रा कमी दाखवण्यात आली. म्हणूनच जपानच्या ग्रीनपीस शाखेने सर्व जगाला फुकुशिमात काय चालले आहे? जनतेचे विस्थापनाचे दु:ख काय आहे? जपान सरकार कसा खोटेपणा करीत आहे? नुकसान भरपाई कशी टाळण्यात येत आहे? परिसर शुद्धिकरणाचे काम कसे तकलादू आहे. या गोष्टी दाखवण्यासाठी फुकुशिमा विटनेस टुअर आयोजित करण्यात आली. फ्रान्स, जर्मनी, दक्षिण कोरिया, पोलंड या भागांतून अणुप्रकल्पाविरोधात काम करणारे कार्यकर्ते, भारतातून जैतापूर प्रकल्पाविरोधात काम करणारे सत्यजीत चव्हाण व कूडनकुलमचे सुंदरराजन यांना आमंत्रित करण्यात आले. दिनांक १५ ते २१ फेब्रुवारी या काळात फुकुशिमा प्रकल्प बाधितांशी संवाद साधण्यासाठी निरनिराळ्या ठिकाणी सभा आयोजित केल्या गेल्या. सगळ्यांना किरणोत्सार मापन यंत्र देण्यात आले. १६ फेब्रुवारीपासून सर्वच प्रतिनिधी एका भयानक वास्तवाला सामोरे गेले. ज्याची आपण कल्पनाही करू शकत नाही.

**श्री० केनीची हासेगावा** । मूळ गाव : इताते, प्रांत - फुकुशिमा, अणुऊर्जा प्रकल्पापासून ४५ किमी । दुधाचा व्यवसाय- ५० गायी होत्या.

संपूर्ण कुटुंबासह राहणारे गृहस्थ. दोन मुले, सुना, नातवंडे, यांच्यासह सकाळी सहापासून दिवस सुरू व्हायचा. ५० गायींची देखभाल, दूध काढणे इत्यादी कामे फार्महाऊसमध्ये आनंदात केली जायची.

आता सगळं संपलंय. त्यांचे गाव प्रशासनाने राहण्यासाठी धोकादायक घोषित केले. तो दिवस होता २२ एप्रिल २०११. दुर्घटना घडली होती ११ मार्च ते १४ मार्च २०११. एक महिन्याहून काळ प्रशासनाने येथील जनतेला किरणोत्साराला सामोरे जाण्यास भाग पाडले. मुलांना हासेगावांनी आधीच दुसरीकडे नेले होते. मग आला सर्वांत दु:खाचा क्षण- गायींच्या दुधामध्ये किरणोत्साराची मात्रा भयानक वाढली होती. दूध धोकादायक घोषित करण्यात आले. मुलांसारख्या वाढवलेल्या पन्नास गायींना मारून टाकावे लागले. हासेगावांच्या दु:खाला पारावार उरला नाही.

दाते शहरात आता हासेगावा विस्थापितांचे जीवन जगत आहेत, तात्पुरत्या बांधलेल्या छावणीत. त्यांची दोन्ही मुले वेगवेगळ्या शहरात राहायला गेली. हासेगावा सांगतात, ''सरकारने वेगवेगळे तज्ज्ञ पाठवले. अणुशास्त्रज्ञ पाठवले. सर्वांनी सांगितले की, इताते गाव सुरक्षित आहे. जनतेला फसवले सरकारने. किरणोत्साराची मात्रा जास्तच होती. महिन्यानंतर मग कशाला गावं खाली करावयास लावली? किरणोत्सारापासून घर, अंगण व शेती शुद्ध करायचे काम ठेकेदारांना देण्यात आले. जमिनीचा वरचा ५ सेमीचा थर काढून टाकण्यात येत आहे. पण काढलेली

■

आमच्याशी बोलताना त्यांच्या अश्रूंचा बांध फुटला. किरणोत्सारापासून मुलांचे रक्षण करणे, हेच या मातेचे ध्येय आहे. शेवटी त्या म्हणाल्या, ''कशाला पाहिजे अणुऊर्जा. अन्य उपाय नसतील तर मेणबत्तीत राहू. स्त्रियां, मुले व मानवाची सुरक्षितता महत्त्वाची.''

---

किरणोत्सारी माती एका ठिकाणी जमा केलेली तशीच आहे. त्याचे कारण काय? नवख्या कामगारांकडून घराचे छत साफ करून घेतले जात आहे. पेपर टॉवेलने कौलं साफ केली जात आहेत. चीड येते सर्वांची. थॉयराइडच्या केसेस वाहत आहेत. आम्हाला मुलांची काळजी वाटते. इताते गावकऱ्यांमध्ये 'घरी जायचे आहे' हाच द्रावक विचार आहे, पण आतून सगळ्यांनाच माहीत आहे, की हे जिवंत असेपर्यंत शक्य नाही. कमीतकमी इथली परिस्थिती काय आहे, हे जगाला कळावे म्हणून जर्मनी, ऑस्ट्रेलिया, कोरिया व बेल्जियम या देशांमध्ये मी फिरलो आहे. भारतातही सांगा आमची कर्म कहाणी. जपान सरकारवर दबाव येऊ द्या.'' आशावाद कोसळू नये म्हणून स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न हासेगावा करीत आहेत.

**श्री० होरोशी कान्नो** । मूळ गाव : इताते, प्रांत : फुकुशिमा, दाईची अणुऊर्जा प्रकल्पापासून ४५ किमी । सेंद्रिय शेती करणारे शेतकरी ।

श्री० होरोशी कान्नो ३५ प्रकारच्या भाज्या कोबी, गाजर, सीया इत्यादी सेंद्रिय पद्धतीने उत्पादन करणारे हाडाचे शेतकरी. दुर्घटनेनंतर त्यांना गाव सोडावे लागले. स्वत:ची कसलेली जमीन सोडताना त्यांना झालेल्या यातनांची कल्पनाही करवत नाही. फुकुशिमा शहरात तात्पुरत्या लहान घरात त्यांचा गेली तीन वर्षे श्वास कोंडला जातो आहे. अणुऊर्जेचा त्यांना भयंकर तिरस्कार आहे. ही मानवविरोधी व निसर्ग विघातक ऊर्जा आहे. अणुऊर्जेचा मानव अट्टाहास का करीत आहे? असे प्रश्न ते आम्हाला विचारतात.

जपान सरकारने सांगण्याआधीच स्वत:हून त्यांनी घर सोडले. शासन लोकांना मदत करण्यासाठी नसते, याची आता त्यांना खात्री पटली आहे. पर्यावरणप्रेमी कान्नो यांना मुळापासून उखडून जाण्याने मोठा धक्का बसला. स्वत:च्या गावी कधीही परतू न शकण्याच्या विचाराने ते व्यथित होतात. फुकुशिमाजवळ शेतजमीन विकत घेऊन शेती करायचा, जमिनीची नाळ पुन्हा जोडायचा प्रयत्न करीत आहेत. मानवाला स्वत:च्या बुद्धिमत्तेचा असलेला अहंकारच त्याच्या अस्तित्वाच्या मुळाशी येणार, असे त्यांचे ठाम मत आहे.

**श्रीमती मीनाको सुगानो** । मूळ गाव : दाते शहर, प्रांत : फुकुशिमा । किंडरगार्डन शिक्षिका । तीन मुलांच्या आई.

किरणोत्साराची मात्रा जास्त असल्याने जुलै २०११ ला दाते शहरातील यांचे घर सरकारने रिकामे करण्यास सांगितले. पण मार्च ते जुलैपर्यंत त्यांचे कुटुंबीय किरणोत्साराचा त्रास सहन करीतच होते. मग दाते शहराच्या दुसऱ्या भागात जेथे किरणोत्साराची मात्रा कमी आहे. तेथे कुटुंबीयांसह राहायला गेल्या. जानेवारी २०१३ ला त्यांना परत मूळ घरी जाण्यास सरकारने सांगितले. का तर किरणोत्सार कमी झाला आहे. पण त्यांनी स्वत: जुन्या घराची किरणोत्साराची मात्रा मोजली. ती खूपच जास्त होती. पण तेव्हापासून त्यांची नुकसान भरपाईही बंद करण्यात आली. त्यांना माहिती आहे की मुलांवर किरणोत्सर्गाचे वाईट परिणाम होतात. म्हणूनच त्यांनी आयुष्य नव्या ठिकाणीच सुरू ठेवायचा निर्णय घेतला. मुलांची शाळा त्यांनी बदलली. मुलांचे दु:ख, नवीन जागेत स्थिरावताना येणाऱ्या अडचणी, स्वत:ची सोडलेली नोकरी,

■

''सरकारला ही दुर्घटना दडपायची आहे. स्वत:च्या नागरिकांना सरकारने वाऱ्यावर सोडले आहे. किरणोत्साराची मात्रा खोटी दाखवण्यात आली. स्त्रिया व मुलांना तरी सरकारने मदत करायला हवी होती. टेपको कंपनी व सरकारची कृती क्षमा करण्यायोग्य नाहीच. हा खूनच आहे. किरणोत्साराने आम्ही कसे आजारी पडू व मरू हे आम्हालाच माहिती नाही. माझा घसा, डोळे व बुद्धी आता कमी काम करू लागली आहेत. पण जोपर्यंत या कंठातून आवाज येईल तोपर्यंत आमच्या वेदना मी जगासमोर मांडेनच.''

सरकारची नसलेली मदत आणि या अन्यायाविरुद्ध, अणुऊर्जेविरुद्ध आवाज उठवण्यासाठी जपानभर फिरावे लागणे, यांमुळे त्यांचे आयुष्य पूर्णत: घुसळून निघाले. मुलांना कमी वेळ देता येतो म्हणून त्या व्यथित होतात, आमच्याशी बोलताना त्यांच्या अश्रूंचा बांध फुटला.

किरणोत्सारापासून मुलांचे रक्षण करणे, हेच या मातेचे ध्येय आहे. शेवटी त्या म्हणाल्या, ''कशाला पाहिजे अणुऊर्जा. अन्य उपाय नसतील तर मेणबत्तीत राहू. स्त्रियां, मुले व मानवाची सुरक्षितता महत्त्वाची.''

**श्रीमती तासुको ओकावारा** । मूळ शहर : कारीयामा, अणुऊर्जा प्रकल्पापासून ४० किमी । मशरुमची शेती । आता : लहानसे हॉटेल-दुकान चालवतात.

श्रीमती ओकावारा कठपुतलीचा खेळ दाखवत होत्या. त्यांच्या शेतातल्या मशरुमची कहाणी. अणुप्रकल्पातील अपघातामुळे ६०,००० मशरुमची पोती किरणोत्सारी ठरल्यामुळे नष्ट करावी लागली. त्यामुळे रात्रीची झोप नष्ट झाली. कठपुतलीच्या नाटकाच्या शेवटचा अंक चालू होतो. जोडपे म्हातारे असते. विस्थापितांचे जीवन जगत असते. मूळ गावातल्या सुखी जीवनाच्या आठवणी काढल्या जातात. मात्र जग सगळे विसरलेले असते. आम्ही काही क्षण सुन्न होतो. 'आम्हाला विसरू नका...फुकुशिमाला विसरू नका. फार त्रासदायक असते ही भावना की सर्व आपणांस विसरले. सर्व जगात आमच्या वेदना पोहचवा.' आर्ततेने ओकावारा आवाहन करतात.

फुकुशिमा भागातील शेतकऱ्यांना त्या एकत्र आणत आहेत. लहान लहान गट स्थापन करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहेत. स्वत:च्या सरकारवर नाराज ओकावारा अणुतंत्रज्ञान निर्यातीला विरोध करतात. अणुऊर्जाविरोधी आंदोलन तीव्र करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहण्याचा निश्चय करतात. त्यांच्या पतीने गिटारच्या संगतीने गोवलेले फुकुशिमाचे गीत हृदय हेलावून टाकते, शब्द समजत नसतानाही.

**श्री० कात्सुताका इडोगावा** । मूळ शहर : फुतुबा, दाईची अणुऊर्जा प्रकल्पाचे शहर । शहराचे माजी महापौर.

'अधिकृत संदेश येण्याआधीच १९ मार्च २०११ ला शहराचे प्रथम नागरिक या नात्याने वर्तमान आणि पुढील पिढ्यांसाठी सर्व शहरच रिकामे करण्याचा निर्णय घेतला. जनतेनेच जनतेला मदत करावी. सरकार अणु कंपन्यांना मदत करते.' अतिशय शांत व गंभीर चेहऱ्यामागच्या वेदना प्रकट होत होत्या. ''सरकारला ही दुर्घटना दडपायची आहे. स्वत:च्या नागरिकांना सरकारने वाऱ्यावर सोडले आहे. किरणोत्साराची मात्रा खोटी दाखवण्यात आली. स्त्रिया व मुलांना तरी सरकारने मदत करायला हवी होती. टेपको कंपनी व सरकारची कृती क्षमा करण्यायोग्य नाहीच. हा खूनच आहे. किरणोत्साराने आम्ही कसे आजारी पडू व मरू हे आम्हालाच माहिती नाही. माझा घसा, डोळे व बुद्धी आता कमी काम करू लागली आहेत. पण जोपर्यंत या कंठातून आवाज येईल तोपर्यंत आमच्या वेदना मी जगासमोर मांडेनच.''

...माझ्या मनात जैतापूर घोळत होते.
कोकणाला...रत्नागिरी, सिंधुदुर्गाच्या भूमीला
अणुऊर्जेचा शाप नको असे मनोमन वाटत होते.
कोकणचा आंबा, काजू, कोकम, ताजी मासोळी,
लाल माती, कायम जिवंत राहावी. कोकणी
माणूस लाल मातीतच समाधानी राहावा, अशी
कोणाची इच्छा असणार नाही?

------

संयुक्त राष्ट्रातही त्यांनी फुकुशिमाचा आवाज उठवला. स्वत:चे फुतुबा शहर पुन: वसवायच्या त्यांचा विचार कायम आहे. स्वत:च्या जुन्या घराच्या खिडकीतून दिसणारा फुकुशिमाचा समुद्रकिनारा अजूनही त्यांना आठवतो आहे. त्यांचे मन व्याकूळ करीत आहे....

वरील कहाण्या या प्रातिनिधिक आहेत. त्यांची दु:खं जगाच्या पाठीवरील विस्थापितांच्या दु:खांसारखीच आहेत. सरकारचा नाकर्तेपणा, खोटेपणा हा आपल्या देशासारखाच आहे. अणुशास्त्रज्ञांच्या भूलथापा, कंपन्यांचे जबाबदारीपासून पलायन, हेही आपल्या देशातल्या सारखेच आहे. प्रसारमाध्यमांकडूनही फुकुशिमा वासियांच्या दु:खाला जपानमध्ये योग्य आवाज मिळू शकलेला नाही.

**पंतप्रधानांच्या निवासासमोर निदर्शने** : जपानमध्ये अणुऊर्जाविरोधी आंदोलन जुने आहे. फुकुशिमा अपघाताने या आंदोलनाचा वणवा पेटला. गेली तीन वर्षे प्रत्येक शुक्रवारी सायंकाळी ६.३० ते ८.०० च्या दरम्यान टोकयोतील पंतप्रधानांच्या कार्यालयाबाहेर निदर्शने केली जातात. २१ फेब्रुवारीला फुकुशिमा दौऱ्यातल्या आम्ही सर्वांनी या निदर्शनात भाग घेतला. जपानच्या विविध भागांतून आलेली जनता संगीत, गाणी, मेणबत्त्या, मुखवटे, घोषणा इत्यादींद्वारे आपला अणुऊर्जाविरोध प्रकट करीत होती. वातावरण अणुऊर्जा विरोधाने भारून गेले होते. जपानच्या पंतप्रधानांचे कान मात्र हे चित्कार ऐकत असतील का? की आपल्याच पंतप्रधानांप्रमाणे, मुख्यमंत्र्यांप्रमाणे, प्रशासनाप्रमाणे तेही अणुऊर्जा विरोधासाठी बहिरे झाले आहेत. शेवटी जगात सगळीकडे शासकांची शोषकवृत्ती व उदासीनता सारखीच!

**समुद्रही प्रदूषित** : फुकुशिमातील दाईची अणुप्रकल्पामधील शीतलीकरणाची यंत्रणा कोलमडून पडल्यावर आतला भाग वितळला. किरणोत्सार बाहेर पसरू लागला. मात्र वितळलेला भाग थंड करण्यासाठी समुद्राच्या पाण्याचा वापर करण्यात येऊ लागला. हे पाणी साठवून ठेवणे खर्चिक व जवळ जवळ अशक्य होते. आता समुद्राच्या पाण्याची किरणोत्सारीता प्रचंड वाढली आहे. प्रशांत महासागरातील अगदी अमेरिका-कॅनडाच्या किनाऱ्यापर्यंत किरणोत्साराचा धोका पोहचला आहे. जपानच्या पूर्व किनाऱ्यावरील मासेमारी पूर्णपणे कोलमडली आहे. पृथ्वीचा एखादा भाग कायमचा निकामी करण्याची क्षमता केवळ अणुऊर्जेतच आहे. अणुऊर्जा घातकच आहे...

**जैतापूर प्रकल्प कोकणात व्हावा?** : त्यांच्या जखमा, त्यांची दु:खे, अणुऊर्जेचे परिणाम भयंकर घातक आहेत. अगदी ६०-७० किमी लांबच्या जनतेलाही घरे रिकामी करावी लागली. संपूर्ण फळफळावळ, भाज्या निरुपयोगी झाल्या. पशुधन नासले. ही सगळी परिस्थिती बघताना माझ्या मनात जैतापूर घोळत होते. माझ्या कोकणाला...रत्नागिरी, सिंधुदुर्गाच्या भूमीला अणुऊर्जेचा शाप नको असे मनोमन वाटत होते. कोकणचा आंबा, काजू, कोकम, ताजी मासोळी, लाल माती, कायम जिवंत राहावी. कोकणी माणूस लाल मातीतच समाधानी राहावा, अशी कोणाची इच्छा असणार नाही? मग आपण फुकुशिमा-तेथील मानव-प्राणी- वनस्पती यांच्या वेदना आठवू या...अजून कित्येक वर्षे त्यांना किरणोत्साराचा शाप भोगावा लागणार आहे. म्हणूनच जैतापूर प्रकल्प कोकणात न होण्यासाठी आपण काय करणार आहोत, यावरच आपले कोकण-प्रेम दिसणार आहे.

('रत्नागिरी टाइम्स'मधून साभार)

■

संपर्क : ८८९८७७०२३२

कविता

# सगुणा

शोभा करांडे

## स्त्री धर्म

परिघात कोंडलेले
आकाश मोकळे करा
पंखावर स्वातंत्र्याचे
निशाण कोरत चला
शब्द दिले सावित्रीने
लेकींनो, चला पूर्ण विचाराने
मातृसत्ता आपुला
समृद्ध वारसा
निऋती ते जिजाऊचा
इतिहास आठवा
अनंत अडथळे अपार कष्ट
समताच आपुले लक्षहोऊ या माउली
आरक्षणे ठरवती स्थाने
भासामधले गाणे
हुरळून, बावरणे विसरा...
विचार साऱ्या पंथाचे साठवा
स्त्री जाणिवा मनी दाटवा
धिरा-धिराने रान पेटवा
भ्रष्ट, बेरकी, लोभी सत्ता
सत्य-माणुसकीच्या माथी लाथा
नीतिमूल्यांची करून होळी
बेलगाम, सत्तांध टोळी
क्षितिजावर स्त्रीधर्माची साऊली
उभ्या जगाची होऊ या माउली

## आभास

भासामध्ये विचारांचे
भान असे सुटावे
अन् माथ्यावर टोपी-फेटे बांधावे
विराट शक्ती, आदिम वारसे
सारे लढे थंड कोळसे?
काळालाही कोडे पडे
समतेचे तीव्र लढे
माळावरती फुलले मळे
कड्या-कपारी जिवंत झरे
अंक ना बदले पळसाचा
जागर उभा संतांचा
वाटा दाविती समतेच्या
याकडे फिरवूनी पाठ
बाबा, बापू, माता, देवी झाले दाट
डोक्याचा झाला पुरता माठ,
ही लाट आहे साचलेली
बुद्धी-भान खचलेली
सत्तेची दिसती दिवास्वप्ने
अधिकाराची आभास तळी
नीतिमूल्ये पायदळी
प्रसिद्धी-पैशाची काळ मिठी
तुम्ही पटावरचे सोंगटी
सारे निर्णय त्यांच्या हाती
आभासातच चौकट मारून घेती
ते आरक्षण तुम्हा देती
ती समजून घ्या ग नीती
ती समजून घ्या ग नीती

ORIGINAL

भारत सरकार
**GOVERNMENT OF INDIA**

**भारत के समाचारपत्रों के पंजीयक का कार्यालय**
**OFFICE OF THE REGISTRAR OF NEWSPAPERS FOR INDIA**

## पंजीयन प्रमाण–पत्र
## CERTIFICATE OF REGISTRATION

प्रमाणित किया जाता है कि प्रेस और पुस्तक पंजीकरण अधिनियम, 1867 के अन्तर्गत इस समाचारपत्र को पंजीकृत कर लिया है :
This is to certify that this newspaper has been registered under the Press and Registration of Books Act, 1867 :

| | |
|---|---|
| 1. समाचार पत्र का नाम<br>Title of the Newspaper | SAGUNA |
| 2. समाचार पत्र की पंजीयन संख्या<br>Registration Number of the Newspaper | MAHMAR/2013/52241 |
| 3. भाषा/भाषाएं, जिसमें/जिनमें समाचारपत्र प्रकाशित किया जाता है<br>Language/Languages in which it is published | मराठी MARATHI |
| 4. इसके प्रकाशन का नियतकाल तथा जिस दिन/दिनों/तिथियों को यह प्रकाशित होता है<br>Periodicity of its publication and the day/days/dates on which it is published | तिमाही QUARTERLY |
| 5. समाचारपत्र की फुटकर कीमत<br>Retail selling price of the newspaper | Rs. 30/- |
| 6. प्रकाशक का नाम/Publisher's Name | SHOBHA KARANDE |
| राष्ट्रीयता/Nationality | INDIAN |
| पता/Address | ROW HOUSE NO. SD-13 & 14, HIMALI HOUSING SOCIETY, NEAR MANGESHKAR HOSPITAL, ERANDWANA, PUNE, MAHARASHTRA-411004. |
| 7. मुद्रक का नाम/Printer's Name | SHOBHA KARANDE |
| राष्ट्रीयता/Nationality | INDIAN |
| पता/Address | ROW HOUSE NO. SD-13 & 14, HIMALI HOUSING SOCIETY, NEAR MANGESHKAR HOSPITAL, ERANDWANA, PUNE, MAHARASHTRA-411004. |
| 8. सम्पादक का नाम/Editor's Name | SHOBHA KARANDE |
| राष्ट्रीयता/Nationality | INDIAN |
| पता/Address | ROW HOUSE NO. SD-13 & 14, HIMALI HOUSING SOCIETY, NEAR MANGESHKAR HOSPITAL, ERANDWANA, PUNE, MAHARASHTRA-411004. |
| 9. जिस स्थान पर मुद्रण का काम होता है, उसका सही तथा ठीक विवरण<br>True and precise account at the premises where printing is conducted | SHREE BALAJI ENTERPRISES, NEAR TALATHI OFFICE, DHAYARI PHATA, PUNE, MAHARASHTRA-411041. |
| 10. प्रकाशन का स्थान<br>Place of publication | 7, MADHAV-LAXMI APARTMENT, 2079, SADASHIV PETH, VIJAYA NAGAR COLONY, PUNE, MAHARASHTRA-411030. |

दिनांक /Date:25/9/2013

( के. गणेशन K.GANESAN)
भारत के समाचारपत्रों के पंजीयक
REGISTRAR OF NEWSPAPERS FOR INDIA

Online CR

Registered with the registrar of Newspapers for India Under No. MAHMAR/2013/52241

